रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ । अंक २३५ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹

# दिशाहीन अर्थसंकल्प

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे जनतेच्या अपेक्षांची थट्टा आहे. रोजगारनिर्मिती, शेतकरी कल्याण आणि मध्यमवर्गीय दिलासा याबाबत कोणतीही ठोस दिशा या अर्थसंकल्पात दिसत नाही. मोठे आकडे, फसवे दावे आणि पोकळ घोषणांच्या आड सरकार आपले अपयश लपवण्याचा प्रयत्न करत आहे. महागाईने सामान्य नागरिक होरपळत असताना आयकर भरणाऱ्या वर्गालाही वाऱ्यावर सोडण्यात आले आहे. शेती संकटात असताना भरीव तरतुदींचा अभाव स्पष्ट आहे. हा अर्थसंकल्प विकासाचा नाही, तर केवळ प्रचाराचा आणि जनतेच्या विश्वासघात असल्याचा आरोप सर्व स्तरातून होत आहे. केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी (दि.१) नव्यांदा लोकसभेचा अर्थसंकल्प सादर केला. त्यामध्ये त्यांनी जवळपास दीड तास भाषण केले. विशेष म्हणजे हे भाषण मागच्या भाषणापेक्षा थोडे मोठे होते. शिवाय या भाषणाने सर्वात जास्त वेळ चालणारे भाषण म्हणून विक्रम नोंदवला आहे. मात्र, तरीही सर्वसामान्यांची झोळी रिकामीच पाहायला मिळाली आहे. तसेच, अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ असून त्यात मध्यमवर्गीय, शेतकरी, देशातील युवा वर्गासाठी विशेष असे काहीही ठोस केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या सर्व वर्गांचा पुन्हा एकदा भ्रमनिरास झाला आहे. सर्वाधिक कर उत्पादन देणाऱ्या महाराष्ट्राच्या बाबतीत केंद्र सरकारची दुजाभावाची वागणूक याही वेळी कायम राहिली आहे. पान २ वर

## घोषणाचा पाऊस




भारताला वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून प्रोत्साहन देणार. त्यासाठी देशात ५ प्रादेशिक केंद्रे स्थापन करण्यासाठी राज्यांना पाठिंबा देण्यासाठी एक योजना प्रस्तावित करणार. देशातील मंदिरांसाठी ५ हजार कोटींची घोषणा केली आहे. २० पर्यटन स्थळांवर १० हजार गाईड असणार. त्यामुळे रोजगाराची संधी मिळणार. तसेच, १५ पुरातत्वीय स्थळे एकात्मिक सांस्कृतिक स्थळांमध्ये विकसित करणार.



### काय स्वस्त?

लिथियम आयन बॅटरी, सौर पॅनेल, वैद्यकीय उपकरणे, एलसीडी, एलईडी, भारतीय कपडे, कॅन्सर-मधुमेहाची औषधं, क्रीडा साहित्य, मोबाईल, ईव्ही बॅटरी, ईव्ही वाहने, मोटारसायकल, फ्रोझन मासे, परदेशात शिक्षण, सीएनजी, बायोगॅस, सोलर संबंधित वस्तू, सौर पॅनल, अपघात विमा

### काय महाग?

पीव्हीसी फ्लेक्स शीट्स, इंटरॅक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्ले, चघळण्याचा तंबाखू, फिल्टर खैनी, जर्दा (सुगंधित तंबाखू), गुटखा, दारू, भंगार, ऑप्शन ट्रेडिंग, खनिजं

केंद्र सरकारने ५३.५ लाख कोटी रुपयांच्या खर्चाचा आराखडा मांडला आहे.

- मुंबई मेट्रो : १,७०२ कोटी
- पुणे मेट्रो : ६१७ कोटी
- ग्रामीण भागांतील रस्ते : ३७८ कोटी
- कृषी आधारित बिझनेस नेटवर्कसाठी : १६७ कोटी
- सौर उर्जिकरणासाठी : २०७ कोटी
- ॲग्री बिझनेस : ६४६ कोटी
- संस्थात्मक संरचना क्षमतेसाठी : २४० कोटी
- इकॉनॉमिक क्लस्टरसाठी : २८३ कोटी




यावर्षी दीर्घकालीन आजार असलेल्यांना खासकरून कॅन्सर आणि डायबीटिज रुग्णांसाठी मोठी घोषणा केली आहे. कॅन्सर आणि डायबीटिजची औषधे बाजारात खूप महाग मिळतात, त्यामुळे सर्वसामान्य आणि सामान्य लोकांना ही औषधे विकत घेणे परवडत नाहीत. त्यामुळे ही औषधे आता स्वस्त होणार असून डायबीटिज आणि कॅन्सर रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.





# शेतकरी 'अर्थ'हीन




केंद्र सरकारच्या बजेटने शेतकऱ्यांचा जाणीवपूर्वक विश्वासघात केला आहे. कर्जमाफी, हमीभाव, उत्पादनखर्चावर आधारित दर याबाबत ठोस निर्णय घेण्याऐवजी केवळ घोषणांचा पाऊस पाडण्यात आला आहे. शेतकरी संकटात असताना हे बजेट उद्योगपतींच्या तिजोरी भरण्यासाठी वापरले गेले. शेतीला आधार देण्याऐवजी शेतकऱ्यांची थट्टा करणे हेच या बजेटचे खरे स्वरूप असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे 'शेतकऱ्यांच्या ताटात रिकामी थाळी' ठेवून त्यावर विकासाची जाहिरात लावण्याचा निर्लज्ज प्रकार आहे. सरकारने पुन्हा एकदा आकड्यांचा खेळ केला आहे, पण या आकड्यांत शेतकऱ्याचा जीव, घाम आणि कर्जबोजा कुठेही दिसत नाही. अर्थसंकल्पातील तथाकथित तरतुदी पाहिल्या तर हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांसाठी नसून शेतकऱ्यांच्या नावाने केलेली फसवणूक आहे. नारळ संशोधन केंद्रांच्या नावाखाली देशातील शेतकऱ्यांच्या हातात नारळ दिले आहे हे स्पष्ट होते. अशी टिका शेतकरी नेते, स्वाभिमानीचे माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली आहे. पान २ वर




## निवडणुका तिथेच पायघड्या

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी रविवारी लोकसभेत २०२६-२७ चा सामान्य अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात त्यांनी अनेक महत्त्वाच्या योजनांची घोषणा केली आहे. यंदा पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू, पुदुचेरी आणि केरळ या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. केरळ वगळता इतर चार राज्यांमध्ये मार्च किंवा एप्रिलमध्ये निवडणुका होऊ शकतात. या राज्यांसाठी अर्थमंत्र्यांनी अनेक प्रकल्पांची घोषणा केली आहे.

निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पात सांगितले की, ओडिसा, तमिळनाडू आणि आंध्र प्रदेशात समर्पित मिनरल पार्क बांधली जातील. याशिवाय, वाराणसी ते सिलीगुडीपर्यंत रेल कॉरिडॉर तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. तसेच, केरळ आणि तमिळनाडूसह इतर राज्यांमध्ये रेअर अर्थ कॉरिडॉर तयार करण्याची घोषणा केली आहे.

रेअर अर्थ मिनरल्समध्ये चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी चार राज्यांमध्ये (तमिळनाडू, केरळ, ओडिशा आणि आंध्र प्रदेश) मिनरल्ससाठी डेडिकेटेड कॉरिडॉर तयार करण्याची घोषणा केली आहे. त्यांनी सांगितले की, रेअर अर्थ परमानेंट मॅग्नेटची योजना नोव्हेंबर २०२५ मध्ये सुरू करण्यात आली होती. त्या पुढे म्हणाल्या, आता आम्ही ओडिशा, केरळ, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडू सारख्या मिनरल-समृद्ध राज्यांना खाणकाम, प्रक्रिया, संशोधन आणि उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी डेडिकेटेड रेअर अर्थ कॉरिडॉर स्थापन करण्यास मदत करण्याचा प्रस्ताव ठेवत आहोत.

अर्थमंत्र्यांनी भारताच्या हाय-स्पीड रेल्वेच्या महत्वाकांक्षांना चालना देणारी घोषणा केली. अर्थसंकल्पात सात हाय-स्पीड पान २ वर

> हा अर्थसंकल्प सुधारणांना नवीन चालना देईल. कौशल्य, प्रमाण आणि शाश्वतता बळकट करण्याचा हा प्रयत्न आहे. सर्वात मोठी संपत्ती म्हणजे नागरिक, आम्ही त्यांच्यात गुंतवणूक केली आहे. हे अद्वितीय अर्थसंकल्प आहे, जे वित्तीय तूट कमी करण्यावर लक्ष केंद्रित करते. यासोबतच, अर्थसंकल्पात उच्च भांडवली खर्च आणि उच्च वाढ यांचा मेळ आहे. हे देशाच्या जागतिक भूमिकेला पुनरुज्जीवित करते.
>
> – नरेंद्र मोदी, पंतप्रधान

> तरुणांकडे नोकऱ्या नाहीत. गुंतवणूकदार आपली भांडवले बाहेर काढत आहेत. घरगुती बचत झपाट्याने कमी होत आहे. शेतकरी अडचणीत आहेत. येणाऱ्या जागतिक धोक्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. हा अर्थसंकल्प भारतासमोरील खऱ्या संकटांपासून पूर्णपणे अनभिज्ञ आहे.
>
> – राहुल गांधी, विरोधी पक्षनेते, लोकसभा

> केंद्र सरकारकडून मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पामध्ये शेतकरी, महाराष्ट्र तसेच देशातील उद्योग आणि उद्योजकांना काहीच मिळाले नाही. ज्या गोष्टींचे या अधी नियोजन केले होते, त्याबाबत काय झाले? त्याचे सांगितले असते तर बरे झाले असते. त्याचबरोबर मंदिरांसाठी ५ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे; मात्र, कोणत्या मंदिरांसाठी हे सांगितले नाही.
>
> – जयंत पाटील, माजी अर्थमंत्री, राष्ट्रवादी (शरद पवार)

> मोदी सरकारकडे आता कोणताही नवा विचार उरलेला नाही. देशासमोर अनेक आर्थिक, सामाजिक आणि राजकीय आहे. याकडे कोणतेही लक्ष देण्यात आले नाही. या अर्थसंकल्पात एससी, एसटी, ओबीसी, इडब्ल्यूएस आणि अल्पसंख्याक समुदायांसाठी कोणतीही तरतूद नाही. आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या राज्य सरकारांना दिलासा देतील, अशी कोणतीही गोष्ट या अर्थसंकल्पात नाही.
>
> – मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रीय अध्यक्ष, काँग्रेस

## कामार्लेत शिंदे गटाला दणका

### ग्रामपंचायत सदस्य शेकापमध्ये

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या कार्य प्रणालीवर खूश होऊन शिंदे गटातील कामार्ले ग्रामपंचायत सदस्य तुकाराम नाईक यांनी शेकापमध्ये प्रवेश केला आहे. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (दि.३०) सायंकाळी लोणघर येथे पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी तुकाराम नाईक या नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

शिंदे गटातील मनमानी कारभाराला कंटाळून कामार्ले ग्रुप



ग्रामपंचायतीचे सदस्य तुकाराम नाईक यांनी शेकापमध्ये प्रवेश केला. ऐन निवडणूकीत तुकाराम नाईक यांनी शेतकरी कामगार पक्षामध्ये प्रवेश केल्याने शिंदे गटाला मोठा फटका बसला आहे. अलिबाग तालुक्यातील लोणघर येथे शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते तुकाराम नाईक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे अलिबाग तालूका मच्छीमार संघटनेचे अध्यक्ष परशुराम गजने, कामार्लेचे मा. सरपंच पान २ वर

## खंडाळे सरपंच नासिकेत कावजीची हकालपट्टी

### पक्ष विरोधी कार्यवाही केल्याचा ठपका

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्ह्यात ऐन निवडणूक रणधुमाळी सुरू असताना पक्षविरोधी कार्यवाही केल्याचा ठपका ठेवत नासिकेत कावजी यांची शेतकरी कामगार पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. खंडाळे येथील शेकाप कार्यकर्त्यांच्या ठाम मागणीनुसार हा निर्णय शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी रविवारी (दि.१) जाहीर केला.

यावेळी शेकापचे जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, प्रफुल्ल पाटील, प्रमोद घासे, विलास वालेकर, नरेश गोंधळी, संतोष गुरव, नामदेव पाटील, प्रणय भगत, सागर गुरव, संदेश पाटील, स्वप्नील पाटील, रुपेश पाटील, विजय थळे, विलास थळे, भरत मानकोले, एकनाथ मुळूसकर, नवीन वेळे, रविंद्र नाईक, सिद्धार्थ गोंधळी, लिलाधर गोंधळी, सूनील घरत, निवास घरत, उदय वेळे, सुरेंद्र वेळे, रविंद्र पाटील, नैनेश राऊत, अशोक बाणे, सुरज राऊत आदी शेकापचे पदाधिकारी, खंडाळे व संगम येथील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असताना, नासिकेत कावजी यांनी पक्षाच्या अधिकृत भूमिकेला छेद देणारी कार्यवाही केल्याचे खंडाळे येथील शेकाप कार्यकर्त्यांच्या निदर्शनास आले. या प्रकारामुळे कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. या पार्श्वभूमीवर संतप्त कार्यकर्त्यांनी थेट शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांची भेट घेतली. जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी भवन येथील सभागृहात बैठक घेण्यात आली. बैठकीत खंडाळे येथील कार्यकर्त्यांनी कावजी यांच्या पक्षविरोधी भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध करत तत्काळ हकालपट्टीची मागणी लावून धरली. कार्यकर्त्यांच्या मागणीची दखल घेत जयंत पाटील यांनी कोणतीही दिरंगाई न करता नासिकेत कावजी यांची शेतकरी कामगार पक्षातून हकालपट्टी जाहीर केली. या निर्णयामुळे पक्षशिस्तीचा ठाम संदेश गेला असून, शेकाप कार्यकर्त्यांनी समाधान व आनंद व्यक्त केला आहे.

### खारेपाट परिसरात बैठकांचा धडाडा | घवघवीत यश संपादन करण्याचा निर्धार

## बदला घेण्यासाठी कार्यकर्ते तयार: जयंत पाटील

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यासह संपुर्ण तालुक्यामध्ये प्रचाराच्या निमित्ताने बैठका घेतल्या जात आहे. त्याच अनुषंगाने अलिबाग तालुक्यातील खारेपाट परिसरात बैठका पार पडल्या. या बैठकांमधून कार्यकर्त्यांचा प्रचंड प्रतिसाद व उत्साह दिसून आला. त्यामुळे संपुर्ण अलिबाग तालुक्यात एक वेगळे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी कार्यकर्त्यांची बदला घेण्याची तयारी दिसून



आली आहे. त्यामुळे या निवडणूकीत आपण घवघवीत यश संपादन करू, असा विश्वास शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

कावीर जिल्हा परिषद गटातील शेकाप-महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन धुमाळ व रामराज पंचायत समिती गणाचे उमेदवार अंजली पाटील यांच्या प्रचारार्थ रविवारी (दि.१) भोनंग येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. पान २ वर

## कुत्र्याने घेतला लहानग्याचा बळी

### सामाजिक कार्यकर्ते आक्रमक

। नेरळ । प्रतिनिधी ।

उमरोली ग्रामपंचायत परिसरात भटक्या कुत्र्यांनी अनेकांचे लचके काढले आहेत. त्यातच येथील एका लहानग्याला भटक्या कुत्र्याच्या दंश झाल्याने त्याचा बळी गेला आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते आक्रमक झाले असून ग्रामपंचायती समोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

भिवपुरी-कर्जत येथील ऋषिकेश देवेंद्र पवार (१०) या मुलावर दि.३ जानेवारी रोजी एका पिसाळलेला कुत्र्याने जीवघेणा हल्ला केला होता. त्यानंतर त्या मुलावर उपचार करून सुद्धा त्याच्या तब्येतीत कोणत्याही सुधारणा होत नव्हती. अखेर ऋषिकेचा शनिवारी (दि.३१) मृत्यू झाला. या मुलाच्या मृत्यूमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. या गोष्टीसाठी स्थानिक प्रशासन जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. तरी प्रशासनाने भटके कुत्रे पाळणारे आणि भटक्या कुत्र्यांना खाऊ घालणाऱ्यांना दोषी ठरवून त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. अन्यथा आम्ही आमच्या पद्धतीने बंदोबस्त करू. वारंवार उमरोली ग्रामपंचायत परिसरात अशा घटना घडत असून याबाबत उमरोलीच्या ग्रामसेवकांना पत्राद्वारे कळवले आहे. मात्र, अद्याप ग्रामसेवकांकडून कोणतेही कारवाई करण्यात आलेली नाही. तरी संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या प्रकरणी प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही तर उपोषणासाठी तहसील कार्यालयामध्ये बसावे लागेल याची नोंद प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी समृद्धी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत अनंतराव सावंत यांनी केलेली आहे.

# चाणजे मतदारसंघ परप्रांतीयांची मक्तेदारी

## राजकीय पक्षांची जाणीवपूर्वक पाठ?

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील चाणजे जिल्हा परिषद मतदारसंघाकडे सर्वच राजकीय पक्षांनी जाणीवपूर्वक पाठ फिरवली आहे, असा संतप्त आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. या मतदारसंघात आज स्थानिकांपेक्षा परप्रांतीयांची मक्तेदारी वाढली असून त्याला थेट राजकीय पक्ष व त्यांचे नेते जबाबदार आहेत, असे बोलले जात आहे.

चाणजे जि.प. मतदारसंघात अनधिकृत बांधकामे, बेकायदेशीर माती उत्खनन, हातगाड्या, फेरीवाले, तसेच उरण चारफाटा येथे भरवला जाणारा बेकायदेशीर आठवडा बाजार यावर कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही. नागरी सुविधांचा पूर्ण बोजवारा उडालेला आहे; मात्र, सत्ताधारी आणि विरोधक दोघेही डोळ्यावर पट्टी बांधून बसल्याचे चित्र आहे. या परिसरात परप्रांतीयांचे



बेकायदेशीर वास्तव्य मोठ्या प्रमाणात वाढले असून त्यातील अनेकजण गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. काही वेळा तर स्थानिकांवर हल्ले करण्यापर्यंत या प्रवृत्तीची मजल गेली आहे. त्यामुळे आम्हाला वाली कोण? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

उरण चारफाटा ते करंजा हा प्रवास वाहतूक कोंडीमुळे अर्धा ते पाऊण तासांचा झाला आहे; मात्र, संबंधित यंत्रणा गाढ झोपेत आहे. स्थानिक नागरिकांनी वारंवार शासकीय यंत्रणांकडे तक्रारी करूनही प्रश्न मार्गी लागण्याऐवजी तक्रारदारांनाच खोट्या गुन्ह्यांत अडकवण्याचे प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते मुद्दाम गप्प आहेत. कारण या परप्रांतीयांच्या मतांची गरज त्यांना असल्याने कोणीही त्यांच्याविरोधात बोलण्याची हिंमत दाखवत नाही. या मतदारसंघातून निवडून गेलेले पदाधिकारी पूर्णपणे निष्क्रिय ठरले आहेत. ते कधीच मतदारसंघात फिरकले नाहीत, ना नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी झाले आहेत; तरीही त्यांनाच पुन्हा उमेदवारी दिल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड नाराजी उसळली आहे. हीच नाराजी आगामी काळात विरोधक कशी भांडवलात बदलतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. चाणजे जि.प. मतदारसंघातील जनता आता मूक राहणार की संतापाचा उद्रेक होणार, हा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

# मविआच्या प्रचाराने विरोधक गारद

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील नवघर जिल्हा परिषद व भेंडखळ पंचायत समिती गणात महाविकास आघाडीने सत्ता बदलाची घंटा जोरात वाजवली आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या उमेदवार प्रेरणा पाटील आणि दीपक भोईर यांनी रस्त्यावर उतरून केलेल्या आक्रमक, ज्वालाग्रही प्रचारामुळे संपूर्ण मतदारसंघ ढवळून निघाला असून विरोधकांची राजकीय जमीन अक्षरशः सरकताना दिसत आहे.

यावेळी जाहीर सभांच्या दिखाव्याला फाटा देत जनतेच्या दारात जाऊन थेट सवाल विचारणारा प्रचार दीपक भोईर यांनी राबवला. विकास कोणाचा? स्वाभिमान कुणाचा? आणि लोकशाही कुणासाठी? असे थेट प्रश्न जनतेसमोर ठेवत त्यांनी महाविकास आघाडीचा लढा हा सत्तेसाठी नव्हे, तर जनतेच्या हक्कासाठीचा संघर्ष



असल्याचे ठामपणे मांडले. या स्पष्ट भूमिकेला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत महाविकास आघाडीच्या बाजूने उघडपणे कौल दिल्याचे चित्र उभे राहिले आहे. उरण बालई व काळाधोंडा परिसरात झालेल्या प्रचारात घोषणांनी आसमंत दणाणून गेला. हात जोडत, प्रश्न विचारत आणि रोखठोक बोलत मतदारांनी 'यावेळी बदल अटळ', 'खोट्यांना जागा नाही', असा स्पष्ट इशारा विरोधकांना दिला. प्रचारस्थळी दिसलेला जनसमुदाय पाहता विरोधकांचा आत्मविश्वास ढासळलेला असून त्यांची प्रचारयंत्रणा पूर्णतः कोलमडली आहे, हे लपून राहिलेले नाही.

या रणसंग्रामात उपजिल्हाप्रमुख नरेश रहालकर, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, सूर्यकांत दरने, एस.के. पुरो, अजय म्हात्रे, गणेश म्हात्रे, एल.जी. म्हात्रे, संदीप जाधव यांच्यासह असंख्य निष्ठावंत कार्यकर्ते, महिला आघाडी आणि युवक मोठ्या संख्येने मैदानात उतरले आहेत.

पान १ वरून

## कामार्लेत शिंदे गटाला दणका

संदीप वाघपंजे, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षातील उप तालुका प्रमुख कैलास गजने, सरपंच अजिता गजने, सदस्य प्रगती शिंगरुत, प्रगती पाटील, गिता नाईक, अनिता पाटील तसेच कामार्लेचे माजी तंटामुक्त अध्यक्ष दिपक गोंधळी, अशोक नागावकर, सुरज पाटील, सुपल पाटील, हेमंत पाटील, सतिश गावंड, आदेश वाघपंजे, नरेंद्र पाटील, उत्तम वगरे, सिताराम नाईक, सागर जाधव आदी शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते, महिला व तरूण उपस्थित होते.

## बदला घेण्यासाठी कार्यकर्ते तयारः जयंत पाटील

त्यावेळी जयंत पाटील बोलत होते. ते पुढे म्हणाले की, अलिबाग तालुक्यात विकासाच्या नावाखाली लुट होत आहे. सर्वसामान्यांचे प्रचंड हाल होत आहेत. पाणी व अनेक प्रश्न या भागातील आहेत. मात्र, ते सोडविण्याऐवजी सर्वसामान्यांना वेठीस धरण्याचे काम विरोधक करीत आहेत. हे कदापी शेकाप सहन करणार नाही. तळागाळातील घटकाला केंद्रबिंदू ठेवून आपण काम करतो. या भागातील विकास शेकापच्या माध्यमातून केला आहे. शेकाप-महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून आल्यावर या गावांच्या विकासाचा अधिक कायापालट केला जाईल. येथील अनेक प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न कायम राहिल. या भागात शेकापला मानणारा वर्ग आजही कायम आहे, असे देखील शेकाप सरचिटणीस जयंत पाटील म्हणाले. यावेळी कावीर जिल्हा परिषद गटातील उमेदवार मोहन धुमाळ, कावीर पंचायत समिती गणातील उमेदवार अनिल पाटील, रामराज पंचायत समिती गणातील उमेदवार अंजली पाटील, अशोक खोत आदींसह शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व भोनंग येथील शेकापचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकरी 'अर्थ'हीन

सर्वप्रथम पंतप्रधान किसान सन्मान निधीचा विचार करूया. शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये देण्याची घोषणा म्हणजे महिन्याला फक्त ५०० रुपये दिले जाणार आहे. आज खताचा एक गोणपाट १,५०० ते १,८०० रुपये आहे, डिझेलचे दर ९० रुपये लिटरच्या पुढे आहेत, बियाण्यांचे दर दुपटीने तिप्पटीने वाढले आहेत. एका एकराचा उत्पादन खर्च किमान ३५ ते ४५ हजार रुपये असताना ६ हजार रुपयांची मदत म्हणजे सरकारने शेतकऱ्याची थट्टा उडवली आहे. महागाई दरवर्षी वाढते, पण ही रक्कम गेल्या अनेक वर्षांपासून तशीच आहे. हे कोणते आर्थिक गणित आहे? असाही प्रश्न शेट्टी यांनी विचारला आहे. सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची भाषा करते, पण अर्थसंकल्पात त्याचे गणित कुठे आहे? जर उत्पन्न दुप्पट करायचे असेल तर उत्पादन खर्च कमी करावा लागतो किंवा मिळणारा दर वाढवावा लागतो. उत्पादन खर्च वाढतच चालला आहे आणि हमीभावाला कायदेशीर दर्जा देण्याबाबत सरकार मुद्दाम मौन बाळगते. स्वामिनाथन आयोगाने सुचवलेला २+५० टक्के फॉर्म्युला स्वीकारण्याची सरकारची हिंमत नाही, कारण त्यामुळे कॉर्पोरेट व्यापाऱ्यांचे नफे कमी होतील.

कर्जबाजारीपणाच्या प्रश्नावर हा अर्थसंकल्प पूर्णपणे अपयशी ठरतो. देशातील ७० टक्क्यांहून अधिक शेतकरी कर्जात आहे. दरवर्षी हजारो शेतकरी आत्महत्या करतात, पण सरकार कर्जमाफीऐवजी कर्ज पुनर्रचनेची गुळगुळीत भाषा वापरते. कर्जमाफी म्हणजे आर्थिक शिस्त बिघडते, असे सांगणारे सरकार उद्योगपतींची लाखो कोटींची कर्जमाफी मात्र एका सहीने माफ करते. हे दुहेरी आर्थिक धोरण नाही तर काय? असा सवालही शेट्टी यांनी उपस्थित केला. कृषी क्षेत्राचा जीडीपीतील वाटा सुमारे १५ टक्के आहे, पण देशातील ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या अजूनही शेतीवर अवलंबून आहे. तरीही कृषी क्षेत्रासाठीचा अर्थसंकल्पीय वाटा अत्यंत तुटपुंजा आहे. सरकारला जर खरंच शेतकरी वाचवायचा असेल तर सार्वजनिक खरेदी व्यवस्था मजबूत करावी लागेल, बाजारातील दलालांची लूट थांबवावी लागेल आणि शेतमालाला किमान हमीभावाची कायदेशीर हमी द्यावी लागेल.हा अर्थसंकल्प कॉर्पोरेटसाठी फायदेशीर आणि शेतकऱ्यांसाठी घातक आहे. आकड्यांच्या जंजाळामागे लपवलेली ही शेतकरीविरोधी नीती देशातील अन्नदाता उद्ध्वस्त करत आहे. शेतकरी हा देशाचा आधारस्तंभ आहे, जाहिरातीचा विषय नाही. सरकारने हे आर्थिक वास्तव लवकरात लवकर समजून घेतले नाही, तर शेतकरी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, हे स्पष्ट आहे. असेही शेट्टी म्हणाले.

**करदात्यांच्या पदरी निराशा**

अर्थसंकल्पात कर सवलतीची मर्यादा १५ लाखांपर्यंत वाढवली जाईल, अशी अपेक्षा होती. अर्थमंत्र्यांनी टॅक्स स्लॅबमध्ये कोणताही बदल होणार नाही हे जाहीर केल्याने सर्वसामान्यांच्या पदरी निराश पडली आहे. मागच्या वर्षीच्या कर स्लॅबमध्ये कलम ८७ अंतर्गत ६० हजार पर्यंतची सवलत आणि ७५ हजार रुपयांची स्टँडर्ड डिडक्शन यामुळे वार्षिक उत्पन्न १२.७५ लाखांपर्यंत पगार असणाऱ्या लोकांना आयकर लागणार नाही. त्यामुळे कमी सवलतींच्या संरचनेला सरकारची पसंती असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. या अर्थसंकल्पातून सरकार सवलतींवर आधारित जुन्या करप्रणालीला पुन्हा चालना देण्याऐवजी हळूहळू त्यापासून दूर जाण्याचा विचार करत असल्याचे संकेत मिळत आहेत.

**तळीरामांच्या खिशाला आर्थिक झळ**

केंद्रीय अर्थसंकल्पात अल्कोहोल, भंगार आणि खनिजांच्या विक्रीवरील कर गोळा केलेल्या स्त्रोतावर दर २ टक्केपर्यंत वाढवला आहे. जो पूर्वी १ टक्के होता. दारूच्या किमती वाढल्याने दारू पिणाऱ्यांना फटका बसणार आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्या आवडत्या पेयांसाठी जास्त पैसे मोजावे लागतील. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, जर दारू खरेदीची संख्या कमी झाली नाही तर सरकारी महसूल वाढेल. त्याचा निश्चितच फायदा होईल. दारू आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. अनेक ठिकाणी दारू विक्रीवर बंदी आहे. डॉक्टरही त्याचे सेवन न करण्याचा सल्ला देतात. तरीही लोक ऐकत नाहीत. आता दारूच्या नवीन किमती दारूप्रेमींना किती त्रास देतील हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## निवडणुका तिथेच पायघड्या

रेल कॉरिडॉरचा प्रस्ताव ठेवला आहे. याचा उद्देश टियर-२ आणि टियर-३ शहरांना मोठ्या शहरी केंद्रांशी जोडणे, रेल्वेला रस्ते आणि कमी अंतराच्या हवाई प्रवासाचा स्वच्छ, वेगवान पर्याय म्हणून पुन्हा स्थापित करणे आहे. अर्थसंकल्पानुसार, पुणे-मुंबई, पुणे-हैदराबाद, हैदराबाद-बंगळुरू, बंगळुरू-चेन्नई, हैदराबाद-चेन्नई, दिल्ली-वाराणसी, वाराणसी-सिलीगुडी या मार्गांना ग्रोथ कनेक्टर म्हणून विकसित केले जाईल. तसेच येथे रेल कॉरिडॉर तयार करण्याचा प्रस्ताव आहे. हे कॉरिडॉर पश्चिम, दक्षिण, उत्तर आणि पूर्व भागांना जोडतात. यामुळे औद्योगिक हब, टेक्नॉलॉजी सेंटर, तीर्थक्षेत्रे आणि उदयोन्मुख शहरी समूहांना जलद, अधिक एकात्मिक नेटवर्कमध्ये आणणे. याशिवाय, अर्थमंत्र्यांनी दुर्गापूरला उत्तर-पूर्व औद्योगिक कॉरिडॉरशी जोडण्याची घोषणा केली.निर्मला सीतारमण यांनी सांगितले की, सरकार, सारख्या व्यावसायिक संस्थांना शॉर्ट टर्म मॉड्युलर कोर्स डिझाइन करण्यास मदत करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. त्यांनी सांगितले की, खासगी भागीदारीत ५ मेडिकल हब तयार केले जातील. भारतात ३ नवीन ऑल इंडिया इंस्टीट्यूट फॉर आयुर्वेद स्थापन केले जातील. मेडिकल टुरिझमसाठी इन्फ्रास्ट्रक्चर विकसित केले जाईल. तसेच, पूर्व भारतात ऑल इंडिया इंस्टीट्यूट फॉर डिझायनिंग स्थापन करण्याची घोषणा केली. उच्च शिक्षणात महिलांच्या सहभाग वाढवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात महिला वसतिगृहे बांधली जातील.

## दिशाहीन अर्थसंकल्प

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे मागील अपयशांचीच पुनरावृत्ती असून तो नव्या दिशेचा नाही, तर अपयश झाकण्याचा प्रयत्न आहे. हा अर्थसंकल्प कोणत्याही समाजघटकाला दिलासा देणारा नसून केवळ मोठे आकडे, फसवे दावे आणि पोकळ घोषणा यांपुरताच मर्यादित आहे. संपूर्ण अर्थसंकल्पात आकड्यांची जुमलेबाजी करण्यात आली असून तो पूर्णतः दिशाहीन आणि वास्तवापासून तुटलेला आहे, अशी तीव्र टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. देशात बेरोजगारीचा स्फोट होत असताना मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीसाठी ठोस धोरण आखण्याची गरज होती. मात्र, या अर्थसंकल्पात रोजगार निर्मितीसाठी एकही स्पष्ट दिशा दिसत नाही. शेतकरी संकटात असताना शेतीसाठी कोणतीही भरीव तरतूद करण्यात आलेली नाही. आयकर भरणारा नोकरीपेशा वर्ग आणि मध्यमवर्ग पूर्णतः दुर्लक्षित राहिला असून त्यांना कोणताही प्रत्यक्ष दिलासा देण्यात आलेला नाही.सरकार ज्या विकासदराच्या उद्दिष्टांची ढोलकी वाजवत आहे, ती उद्दिष्टे कागदावरच राहणार हे स्पष्ट आहे. वास्तवाशी काहीही देणेघेणे नसलेली ही आकडेवारी देशाच्या अर्थव्यवस्थेला दिशा देऊ शकत नाही. हा अर्थसंकल्प विकासाचा नाही, तर निव्वळ घोषणाबाजीचा दस्तऐवज आहे, असा घणाघाती आरोप सपकाळ यांनी केला. अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना त्यांनी सांगितले की, नोटबंदी आणि जीएसटीमुळे देशातील लघु, मध्यम आणि छोटे उद्योग अक्षरशः मोडकळीस आले आहेत. या क्षेत्राला अद्यापही उभारी मिळालेली नाही आणि या अर्थसंकल्पातूनही त्यांना कोणताही ठोस आधार मिळालेला नाही. देशात सर्वाधिक रोजगार निर्मिती याच क्षेत्रातून होते; मात्र, सरकारने या वास्तवाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. मोदी सरकारच्या काळात बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढली असून ताज्या आकडेवारीनुसार दोन पदवीधरांपैकी एक बेरोजगार आहे, म्हणजेच बेरोजगारीचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीच्या बाबतीत मोदी सरकार पूर्णतः अपयशी ठरले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

भारत हा कृषीप्रधान देश असतानाही या अर्थसंकल्पाने शेतकऱ्यांची घोर निराशा केली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट गेल्या १२ वर्षांत पूर्ण झालेले नाही. उलट शेतीवरील खर्च दुप्पट झाला आहे, शेतमालाला योग्य दर मिळत नाही, हमीभावाबाबत कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही आणि शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. या गंभीर प्रश्नांवर अर्थसंकल्पात कोणतीही ठोस तरतूद नाही. वर्षाला ६ हजार रुपये देऊन शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत, हे सरकारने लक्षात घ्यावे, असे सपकाळ म्हणाले.सरकार १० वर्षांत २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर येतील असा दावा करत आहे; मात्र प्रत्यक्षात ८० कोटी जनतेला पाच किलो धान्य द्यावे लागत आहे. मग २५ कोटी लोकांची गरिबी कशी संपली, हा मोठा प्रश्न आहे. ही संपूर्ण आकडेमोड बनवाबनवी आहे. सोन्याचा दर दोन लाख रुपये तोळा आणि चांदीचा दर चार लाख रुपये किलोपर्यंत पोहोचला असतानाही या किमतींवर नियंत्रण आणण्यासाठी सरकारकडे कोणतीही योजना नाही. महागाई आटोक्यात आणण्यासाठीही कोणतेही ठोस धोरण दिसत नाही.

**भारतात सेमी कंडक्टर मिशन**

यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये तंत्रज्ञान क्षेत्रासाठी मोठा अर्थसंकल्प आला आहे. सेमी कंडक्टर निर्मितीसाठी ४० हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आहे. भारतात सेमी कंडक्टर मिशन सुरू करण्याची सरकारची योजना असल्याचे अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या आहेत. त्यामुळे इलेक्ट्रोनिक पार्ट्सच्या निर्मितीसाठी ४० हजार कोटीचे बजेट ही फार मोठी गोष्ट असल्याचे बोलले जात आहे.

**देशाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य**

देशाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत केंद्रीय अर्थसंकल्पात अर्थमंत्री सीतारामन यांनी १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची विक्रमी तरतूद केली आहे. भारताच्या वाढत्या सुरक्षा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर संरक्षण क्षेत्रासाठी राखीव ठेवलेला यंदाचा बजेट एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. केंद्र सरकारने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी संरक्षण खर्चापोटी ७,८४,६७८ कोटी रुपये राखून ठेवले आहेत, तर गेल्या वर्षी यासाठी ६,८१,२१० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. राष्ट्रीय सुरक्षा, लष्करी आधुनिकीकरण आणि स्वावलंबी भारताचे ध्येय बळकट करण्यासाठी ही वाढ करण्यात आली असून शेजारील देशांसोबतचा तणाव, सीमा परिस्थिती आणि 'ऑपरेशन सिंदूर' यासारख्या अलीकडील लष्करी कारवायांमुळे मजबूत आणि आधुनिक सशस्त्र दलांची गरज आणखी अधोरेखित झाली आहे. यंदाचे बजेट विशेषतः भांडवली खर्च, म्हणजेच नवीन शस्त्रे, उपकरणे आणि प्लॅटफॉर्म खरेदीला हायलाइट करते. ड्रोन, लढाऊ विमाने, आधुनिक तोफखाना, नौदल जहाजे आणि सीमावर्ती भागात पायाभूत सुविधांच्या विकासात अधिक गुंतवणूक करण्याचा सरकारचा मानस असून याव्यतिरिक्त भारतीय कंपन्यांकडून ७५ टक्क्यांपेक्षा जास्त संरक्षण खरेदी वस्तूंचे स्रोत तयार करण्याचे धोरण अवलंबले जात आहे. त्यामुळे देशांतर्गत संरक्षण उद्योग मजबूत होईल आणि आयातीवरील अवलंबित्व कमी होईल.मुंबई-अहमदाबाद हायस्पीड कॉरिडॉरसाठी ६१०३ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. एमयुटीपी मुंबईसाठी ४६२ कोटी, एमएमआर रिजनमधअये ग्रीन मोबिलिटीसाठी १५५ कोटी, महामार्गावर आयटीएससाठी ६८० कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे राज्याला ९८ हजार ३०६ कोटी रुपये केंद्राकडून मिळतील. हा निधी मागील वर्षीपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्र टर्शरी केअर मेडिकल एज्युकेशन विकास कर्यक्रमासाठी राज्याला आणखी ३८५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच डेव्हलपमेंट अँड ॲप्लाईड नॉलेज अँड स्कील फॉर ह्यूमन डेव्हलपमेंटसाठी ३१३ कोटींची तरदूत आहे.

**शेअर बाजारात हाहाकार**

केंद्रीय अर्थसंकल्पात शेअर बायबॅकवर कॅपिटल गेन टॅक्स लागू करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. त्यामुळे कंपन्यांच्या बायबॅकच्या माध्यमातून टॅक्स प्लॅनिंगवर निर्बंध येणार आहेत. तसेच शेअर बाजारात सट्टेबाजीला लगाम लावण्यासाठी फ्यूचर्स ट्रेडिंवर सिक्युरीटी ट्रान्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) वाढवण्याची घोषणा करण्यात आली आहे. सरकारने फ्यूचर्स ट्रेडिंगवर एसटीटी ०.०५ टक्के वाढीचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यामुळे शॉर्ट टर्म ट्रेडिंगचा खर्च वाढणार असून बाजारात कायदेशीर गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा वर्तविली जात आहे. दरम्यान, अर्थसंकल्पाच्या भाषणावेळीच शेअर बाजारात मोठ्या हालचाली सुरू झाल्या होत्या. सेन्सेक्स सुरुवातीला ८०० पेक्षा जास्त अंकांनी घसरला होता. तर, निफ्टीही जवळपास ३०० अंकांनी खाली आला होता. मात्र, अर्थसंकल्प सादर केल्यानंतर सेन्सेक्स तब्बल २ हजार अंकांनी तर निफ्टी ७०० अंकांनी घसरला. या अर्थसंकल्पात वैद्यकीय उपकरणे, लिथियम आयन बॅटरी, सौर पॅनेल, वैद्यकीय उपकरणे, एलसीडी, एलईडी, भारतात बनवलेले कपडे, कॅन्सरची औषधं, मधुमेहाची औषधं, क्रीडा साहित्य, मोबाईल फोन, ईव्ही बॅटरी, ईव्ही वाहने, मोटारसायकल, फ्रोझन मासे, ईव्ही लिथियम बॅटरी, परदेशात शिक्षण घेणं स्वस्त, सीएनजी, बायोगॅस, सोलर संबंधित वस्तू, सौर पॅनल, क्रीडा साहित्य, बूट, अपघात विमा स्वस्त होणार आहे. तर पीव्हीसी फ्लेक्स शीट्स, इंटरॅक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्ले, चघळण्याचा तंबाखू, फिल्टर खैनी, जर्दा (सुगंधित तंबाखू), गुटखा, दारू, भंगार, ऑप्शन ट्रेडिंग, खनिजं हे महाग होणार आहेत.

**'बायोफार्मा शक्ती'साठी तरतूद**

जैविक औषधे दीर्घायुष्य आणि जीवनमान सुधारण्यासाठी महत्त्वाची असून ती परवडणाऱ्या दरात उपलब्ध होणे गरजेचे आहे. भारताला जागतिक बायोफार्मा उत्पादन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी 'बायोफार्मा शक्ती' उपक्रमांतर्गत पुढील पाच वर्षांसाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे. त्यामुळे यासंबंधीची एक मजबूत व्यवस्था उभारली जाईल. प्रत्यक्ष प्रकल्प उभारणी संबंधी निर्मला सितारामन काय म्हणाल्या की, या उपक्रमांतर्गत १००० मान्यताप्राप्त क्लिनिकल ट्रायल साईट्सचे जाळे उभारले जाईल. तसेच, आंतरराष्ट्रीय मानकांनुसार औषध मंजुरी प्रक्रिया जलद व प्रभावी करण्यासाठी सेंट्रल ड्रग्स स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन अधिक सक्षम करण्यात येईल. त्यासाठी स्वतंत्र वैज्ञानिक पुनरावलोकन प्रणाली आणि तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात येईल, असे त्या म्हणाल्या.

**भारताला एआय हब बनवणार**

कृषी क्षेत्रात शेतकऱ्यांसाठी या अर्थसंकल्पात एक मोठी आणि दिलासादायक घोषणा करण्यात आली आहे. कृषी क्षेत्रात आधुनिकता आणण्यासाठी 'बहुभाषिक एआय टूल्स' वकसित केली जाणार आहेत. या साधनांमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या स्थानिक भाषेत हवामान, पिकांवरील रोग आणि बाजारभावाविषयी अचूक माहिती मिळेल. एआय मिशनच्या या उपक्रमामुळे दुर्गम भागातील शेतकऱ्यांपर्यंत अत्याधुनिक तंत्रज्ञान पोहोचणार असून यामुळे शेती आणि उत्पादकता वाढण्यास मोठी मदत होणार आहे.तरुणांच्या रोजगार आणि कौशल्यावर लक्ष केंद्रित करत अर्थसंकल्पात 'एआय इन जॉब्स' मोहिमेची घोषणा करण्यात आली आहे. नवीन युगातील तंत्रज्ञानानुसार तरुणांना प्रशिक्षित करण्यासाठी विशेष स्किलिंग प्रोग्राम राबवले जाणार आहेत. तसेच, संशोधन आणि नवनवीन प्रयोगांना चालना देण्यासाठी देखील अर्थसंकल्पात मोठ्या आर्थिक तरतुदी करण्यात आल्या आहेत. अनुसंधान नॅशनल रिसर्च फंड आणि नॅशनल क्वांटम मिशन अंतर्गत एआयच्या मूलभूत पायाभूत सुविधा विकसित केल्या जाणार आहेत. तसेच, रिसर्च अँड डेव्हलपमेंट अँड इनोव्हेशन फंडच्या माध्यमातून स्टार्टअप्सना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यामुळे हे मिशन केवळ तंत्रज्ञान निर्मितीपुरते मर्यादित नसून भारताला एआय हब बनवण्याचे महत्त्वाचे पाऊल आहे.

**परदेशात शिक्षण, उपचार स्वस्त**

यंदाच्या अर्थसंकल्पात विमा, कर, शिक्षण, नोकरी, आरोग्य, तंत्रज्ञान, पर्यटन यासारख्या अनेक क्षेत्रांसाठी महत्वाच्या घोषणा केल्या आहेत. तसेच, शैक्षणिक खर्चाबाबत एक मोठी घोषणा केली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पात परदेशातील वैद्यकीय आणि शैक्षणिक खर्चाबाबत एक मोठी घोषणा केली आहे. टीसीएस खर्चावरील व्याजदर ५ टक्क्यांवरून २ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. त्यामुळे तुमचे पैसे परदेशात खर्च केले तर तुम्हाला आता फक्त २ टक्के व्याज आकारले जाणार आहे. पूर्वी ते ५ टक्के इतके होते. तसेच, हे फक्त शिक्षण आणि वैद्यकीय खर्चासाठी वैध आहे. या मोठ्या घोषणेनंतर आता परदेशात शिक्षण आणि उपचार स्वस्त होणार आहे.

**युवा शक्ती प्रेरित अर्थसंकल्प**

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्याकडून या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्राला पुन्हा एकदा प्राथमिता दिली गेली आहे. यावेळी इनोवेशन आणि कौशल्यावर आधारित शिक्षणावर भर देण्यात आला आहे. तसेच, टियर २ आणि टियर ३ शहरांमध्ये कॉर्पोरेट भागीदारी निर्माण करण्याची घोषणा देखील करण्यात आली आहे. त्यामुळे व्यावसायिक संस्थांना सुविधा आणि प्रशिक्षण मिळेणार आहे. अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात याला युवा शक्ती प्रेरित अर्थसंकल्प म्हटले आहे. हे कर्तव्य भवनात तयार केलेले पहिले बजेट आहे. त्यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची गरज अधोरेखित केली आहे. एआयच्या माध्यमातून शिक्षण आणि रोजगार निर्मिती सुधारण्याची गरज सांगितली आहे.

**महिलांसाठी महत्त्वपूर्ण घोषणा**

यावेळी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली. महिलांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या 'लखपती दीदी' कार्यक्रमाचा विस्तार करण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. या निर्णयामुळे देशभरातील लाखो महिलांना थेट फायदा होणार आहे. 'लखपती दीदी' योजनेचा मुख्य उद्देश स्वयं-सहायता गटांशी संलग्न महिलांचे वार्षिक उत्पन्न किमान १ लाख रुपयांपर्यंत वाढवणे हा आहे. योजनेअंतर्गत महिलांना केवळ प्रशिक्षणच नव्हे, तर त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर सरकारचा भर राहणार आहे. त्यामुळे महिलांना त्यांच्या उत्पादनांना योग्य दर मिळणार असून, शाश्वत उत्पन्नाचा स्थिर स्रोत निर्माण होण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागासह शहरी महिलांसाठीही या उपक्रमातून रोजगार व उद्योजकतेच्या नव्या संधी खुल्या होणार आहेत.

**सीमाशुल्क रद्द करण्याचा प्रस्ताव**

आरोग्य क्षेत्राप्रती संवेदनशीलता दाखवत अर्थमंत्र्यांनी १७ कर्करोगाच्या औषधांवरील मूलभूत सीमाशुल्क रद्द करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. तसेच, सर्वसामान्यांसाठी वैद्यकीय उपचार परवडणारे बनवण्यासाठी आणखी सात दुर्मिळ आजारांवरील औषधे शुल्कमुक्त यादीत समावेश केला आहे. शिक्षणाला रोजगाराशी जोडण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यासोबतच पुढील ५ वर्षांत १५०,००० जेरियाट्रिक केयर गिवर्स आणि १,००,००० आरोग्य व्यावसायिकांना प्रशिक्षित करण्याच्या योजनेवर काम केले जाणार आहे.

**अपघात विम्याच्या व्याज्यावर कर नाही**

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पात विमा क्षेत्रासाठी एक मोठी घोषणा केली आहे. त्यांनी सांगितले की, आता मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाकडून कोणत्याही व्यक्तीला मिळणाऱ्या व्याजावर आयकर आकारला जाणार नाही आणि त्यावर टीडीएस देखील कापला जाणार नाही. मोटार अपघाताचे खटले दशके न्यायालयात प्रलंबित राहतात म्हणून ही घोषणा महत्त्वाची आहे.

**बँकिंग क्षेत्रासाठी मोठी घोषणा**

अर्थसंकल्पीय भाषणात निर्मला सीतारमण म्हणाल्या की, बँकिंग क्षेत्रातील सुधारणा अत्यंत आवश्यक आहेत. सरकार एका नवीन व्हिजनवर काम करत आहे, विशेषतः एनबीएफसींसाठी. भारतीय बँकिंग प्रणालीचा ताळेबंद मजबूत आहे. विकसित भारतासाठी बँकिंगवर एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाईल. पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन आणि आरईसीची पुनर्रचना केली जाईल.

**तंबाखूजन्य पदार्थांवर अतिरिक्त कर**

सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांचं सेवन करणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. कारण त्यांना १ फेब्रुवारीपासून अतिरिक्त पैसे मोजावे लागणार आहेत. सरकारने या उत्पादनांसाठी नवीन कररचना लागू केली असून तंबाखूजन्य उत्पादनांवर आता अतिरिक्त उत्पादन शुल्क आकारले जाणार आहे.

**खेलो इंडिया मिशन**

निर्मला सीतारमण यांनी खेलो इंडिया मिशन सुरू करण्याची घोषणा केली. या मिशनचा उद्देश पुढील १० वर्षांत भारताच्या क्रीडा पद्धतीचे पूर्णपणे रूपांतर करणे आहे. खेळ आता केवळ पदके जिंकण्यापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर रोजगार, कौशल्य विकास आणि आर्थिक विकासासाठी एक शक्तिशाली साधन बनले आहेत. खेलो इंडिया कार्यक्रमाने क्रीडा प्रतिभेचे संगोपन करण्याची एक पद्धतशीर प्रक्रिया सुरू केली. आता पुढील दशकात क्रीडा क्षेत्राचे रूपांतर करण्यासाठी खेलो इंडिया मिशन सुरू करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला.


## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे आदाड, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन शेतजमिन मिळकत श्री. इब्राहीम इस्माईल नाखवाजी व श्री. अशरफअली इस्माईल नाखवाजी, राहणार वाळवटी, पो. उसरोली, ता. मुरुड, जि. रायगड, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. इब्राहीम इस्माईल नाखवाजी व श्री. अशरफ अली इस्माईल नाखवाजी, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी, हे सर्वास कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| आदाड, ता. मुरुड. | ४४७ | १-२६-२०<br>पो.ख. ०-०३-३०<br>एकूण १-२९-५० | १५-९८ |

अलिबाग,
दिनांक : ०२/०२/२०२६

सही/-
(ॲड. संजय म. भगत)
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

# मक्तेदारी, हुकूमशाहीला संपवा : चित्रलेखा पाटील

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

तालुक्यात राजकारणाचा दर्जा घसरला आहे. सर्वसामान्य माणूस त्रस्त झाला आहे. शेतकरी कामगार पक्षामार्फत जनतेच्या हितासाठी अनेक आंदोलने केले आहेत. स्मार्ट मीटरसह खड्डेमय रस्त्याविरोधात आपण रस्त्यावर उतरून आवाज उठविला आहे. गोरगरीबांचा आवाज बनायचे असेल, तर फक्त शेकापचा लाल बावटा घेऊन रस्त्यावर उतरावे लागेल.

तालुक्यात सुरु असलेली मक्तेदारी, हुकुमशाही रोखण्यासाठी कामाला लागले पाहिजे. स्थानिकांचा विकास झाला पाहिजे ही भूमिका आहे. आपला माणूस सत्ता केंद्रात राहिला पाहिजे. त्यासाठी मक्तेदारी आणि हुकूमशाही संपवा, असे आवाहन शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले.







कावीर जिल्हा परिषद मतदार संघातील शेकापचे उमेदवार मोहन धुमाळ, रामराज पंचायत समिती मतदारसंघातील उमेदवार अंजली पाटील यांच्या प्रचारार्थ बोरघर येथे शनिवारी (दि.३१) सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या. यावेळी शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, मोहन धुमाळ हे देवदूत रुपी माणूस आहेत. माणुसकी जपणारे व्यक्ती आहेत. जनतेच्या मागणीनुसार त्यांना उमेदवारी दिली. जनतेच्या विश्वासावर त्यांना उभे केले आहे.शेकाप कार्यकर्त्यांसह काँग्रेस, शिवसैनिकदेखील पाठीशी ठाम उभे आहेत. त्याचा आनंद आहे. या निवडणुकीत मोहन धुमाळसह अंजली पाटील यांना भरघोस मतांनी जनता निवडून देईल असा विश्वास व्यक्त केला.

जे एका पक्षाशी प्रामाणिक राहिले नाहीत. ते जनतेशी प्रामाणिक काय राहणार अशी घाणाघाती टीका चित्रलेखा पाटील यांनी केली. ज्यांची वृत्ती फसवी असते. ती सर्वस्तरातून फसवेगिरी करणारी असते. जनतेलादेखील फसवणारा तो व्यक्ती असतो. त्यामुळे या निवडणुकीत फसवेगिरी करणाऱ्यांना घरी बसवा असे आवाहन शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले.

### कार्यकर्त्यांनो सज्ज व्हा

ज्येष्ठ नेत्यांनी शेकापची रणनीती तळागळात रुजवली आहे. आपला कार्यकर्ता कोणत्याही अमिषाला बळी पडत नाही. यामुळे निवडणुकीच्या शर्यतीत आपला खटारा अंतरात आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हायला हवे. आपण महाविकास आघाडीच्या माध्यमातून जिल्हा परिषदेची निवडणूक लढत आहोत. महाविकास आघाडीतील घटक पक्ष खांद्याला खांदा लावून परिवर्तनाच्या लढाईसाठी सजग राहून काम करीत आहेत. असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

शेतकरी कामगार पक्ष लहान आहे. परंतू चौथी पिढी पक्षाचे काम करीत आहे. अनेकजण अमिष दाखवितात. परंतु या अमिषाला बळी न पडता, सर्वसामान्यांसाठी लढणारा पक्ष म्हणून शेकापची एक वेगळी ओळख आहे. पुढचा काळ हा आपला आहे. या सीटकडे जनता एक वेगळ्या अपेक्षेने बघत आहे. खटारा अंतरात येण्यासाठी ही बैठक घेतली आहे. घरोघरी जाऊन काम करा. विभागाला मोहन धुमाळ सारखा माणूस का गरजेचे आहे हे दाखवून द्या.

विरोधकांकडून पैशाचा पाऊस येणार आहे. एकनिष्ठ व प्रामाणिक उमेदवारालाच जनता निवडून देईल. या तालुक्यात राजकारणाचा दर्जा घसरला आहे. सर्वसामान्य माणूस त्रस्त झाला आहे. गोरगरीबांचा आवाज बनायचे असेल, तर फक्त शेकापचा लाल बावटा घेऊन रस्त्यावर उतरावे लागेल. ही मक्तेदारी, हुकुमशाही रोखण्यासाठी महाविकास आघाडीचे कार्यकर्ते कामाला लागले आहे. विकासाला विरोध नाही, परंतु हा विकास स्थानिकांचा झाला पाहिजे ही भूमिका आहे. आपला माणूस सत्ता केंद्रात राहिला पाहिजे. शेकापने अनेक लढे लढले आहेत. स्मार्ट मीटरसह खड्डेमय रस्त्याविरोधात आपण रस्त्यावर उतरून आवाज उठविला आहे, असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

# खोपटा येथे महाविकास आघाडीच्या रॅलीला प्रतिसाद





### महाविकास आघाडीचे उमेदवार पाच हजारांची आघाडी घेणार : महेंद्र घरत

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत स्वतः मैदानात उतरले आहेत. खोपटा येथे महाविकास आघाडीच्या प्रचारासाठी घरत यांच्या नेतृत्वाखाली भव्य रॅली काढण्यात आली.

यावेळी बोलताना घरत यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार बहुमतांनी निवडून येतील. किमान ५ हजारांची आघाडी मिळेल. कारण गावागावांत महाविकास आघाडीचाच बोलबाला आहे. आमचे उमेदवार सर्वसामान्यांचा आदर करणारे आहेत. मतदारांचा विश्वास ते सार्थ ठरवतील. त्यामुळे मतदारांनी महाविकास आघाडीच्याच उमेदवारांना मतदान करावे. यावेळी माजी आमदार म नोहर भोईर, उरण नगर पालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष भावना घाणेकर, काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, डॉ. मनीष पाटील, ॲड. अविनाश ठाकूर, अलंकार परदेशी, संतोष ठाकूर, घनश्याम पाटील, बबन कांबळे, सुरेश पाटील, रमाकांत पाटील, बी. एन. डाकी तसेच महाविकास आघाडीचे कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

# ‘गद्दारांना धडा’च्या घोषणेसह राजाभाऊ ठाकूर मैदानात

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

काँग्रेसच्या दंडात बळ भरण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष आणि उबाठा शिवसेना आक्रमक भूमिकेत उतरल्याने रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळीला नवा राजकीय वळण मिळालं आहे. महाविकास आघाडीच्या या आक्रमक रणनीतीमुळे संपूर्ण जिल्ह्यात राजकीय वातावरण तापलं असून, विरोधकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.



निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात प्रचाराचा वेग वाढला असताना, काँग्रेसच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्णय शेकाप आणि शिवसेना उबाठाने घेतल्याने महाविकास आघाडीची ताकद अधिक मजबूत झाली आहे. या एकजुटीचा केंद्रबिंदू ठरले आहेत. आवास जिल्हा परिषद गटाचे उमेदवार राजेंद्र मधुकर ठाकूर उर्फ राजाभाऊ ठाकूर, ज्यांनी प्रचारात आक्रमक सूर पकडत जनतेत थेट संवाद साधायला सुरुवात केली आहे.

राजाभाऊ ठाकूर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, ही लढाई फक्त एका उमेदवाराची नाही, तर जनतेच्या विश्वासाची आहे. काँग्रेसच्या दंडात बळ भरण्यासाठी शेकाप आणि शिवसेना उबाठा आमच्यासोबत खंबीरपणे उभी आहे. त्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अचानक सुरू झालेल्या विकासकामांवरही त्यांनी खोचक टीका केली. निवडणुका जवळ आल्या की रस्ते, पाणी, कामांची लगबग सुरू होते. पण जनता दूधखुळी नाही. राजकारण काय चाललंय, हे सगळ्यांना कळतं. तरीही कामं होत असतील, तर निवडणुका रोज झाल्या तरी हरकत नाही, असा टोला त्यांनी लगावला.

शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेना उबाठाने याआधी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत दिलेल्या पाठिंब्याची आठवण करून देत, ही युती केवळ निवडणुकीपुरती नसून जनतेच्या प्रश्नांसाठीची दीर्घकालीन बांधिलकी असल्याचा दावा राजाभाऊ ठाकूर यांनी केला.

महाविकास आघाडीच्या या एकवटलेल्या शक्तीमुळे सातही मतदारसंघांमध्ये प्रभाव दिसून येईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. रस्तोरस्तीचा प्रचार, बैठका, सभा आणि घराघरांत पोहोचणारा संवाद यामुळे काँग्रेसला मिळणाऱ्या या नव्या बळाचा राजकीय परिणाम स्पष्टपणे जाणवू लागला आहे.

# चेंढऱ्यात गृहभेटीतून प्रचाराचा झंझावात

## प्रविणा घासे आणि प्रिया ढवळे यांच्या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

चेंढरे जिल्हा परिषद मतदार संघातील शेकाप व महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रविणा घासे तसेच चेंढरे पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार प्रिया ढवळे यांचा गृहभेटीतून प्रचाराचा झंझावात सुरु आहे. रविवारी (दि.१) चेंढरे, गोंधळपाडा, शिवनगर, चेवलेनगर, स्वामी समर्थ नगर या परिसरात घरोघरी जाऊन प्रचार करण्यात आला.



यावेळी दत्ता ढवळे, संदीप ढवळे, ॲड. परेश देशमुख, प्रशांत फुलगांवकर, दिलीप मानकर, ममता मानकर, रेखा चिमणे, सुभाष घनवट, किशोर पाटील, विलास म्हात्रे, नाना घरत, विरेंद्र साळवी, मिनल माळी, जितेंद्र वाघ, नागेश्वरी हेमाडे, अनिल चिमणे, महेश पवार, लक्ष्मण पवार, तेजस ढवळे, हर्ष ढवळे, निरज ढवळे, पंकज ढवळे, सतिश देशमुख, अशिष तरे, वरद सालीमठ, चंद्रकांत घरत, मरुआई नगरचे कार्यकर्ते तसेच सर्व पदधिकारी, कार्यकर्ते, महिला, तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडूकीचे मतदान येत्या शनिवारी(दि. ७) फेब्रुवारीला आहे. त्या निमित्ताने शेकाप महाविकास आघाडीच्या चेंढरे जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार प्रविणा घासे तसेच चेंढरे पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार प्रिया ढवळे या निवडणूकीच्या रिंगणात उभ्या आहेत.या मतदार संघातील गावे, वाड्या परिसरात मोठ्या प्रमाणात प्रचार सुरु आहे. प्रविणा घासे आणि प्रिया ढवळे यांचा प्रचार रविवारी(दि.१) सकाळी चेंढरेसह गोंधळपाडा, शिवनगर, चेवले नगर, स्वामी समर्थ नगर,परिसरात करण्यात आला. घरोघरी जाऊन मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. खटारा या चिन्हासमोरील बटण दाबून मतदान करा असे सांगितले जात आहे.

# महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा घरोघरी प्रचार



- उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन
- सिद्धिविनायकाला घातले साकडे

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

येत्या ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या रायगड जिल्हा परिषद व मुरुड तालुका पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, शिवसेना उबाठा, शेतकरी कामगार पक्ष व मित्र पक्षांच्या उमेदवारांनी रविवारी नांदगावच्या श्री सिद्धिविनायकाला श्रीफळ अर्पण करून घरोघरी जाऊन प्रचाराची राळ उडवून दिली.

रायगड जिल्हा परिषदेच्या ३८ राजपूरी मतदार संघातून या मित्र पक्षांतर्फे राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित बाळकृष्ण कासार तर ७५ नांदगाव या मुरुड पंचायत समिती मतदार संघातून काँग्रेसचे अस्लम हुसेन हलडे हे निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्यांनी आपल्या मतदारसंघातील मतदारांची घरोघरी जाऊन भेट घेतली व मतदान करुन भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.

यावेळी त्यांच्या समवेत काँग्रेसचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. इस्माईल घोले, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मनोज आप्पा भगत, स्मिताताई खेडेकर, भाई सुर्वे, मुरुड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ नांदगावच्या सरपंच सेजलताई घुमकर, माजी जि.प.सदस्या नम्रता कासार, मुरुडच्या नगरसेविका प्रिताताई चौलकर, प्रमिला माळी, प्रांजली मकू, नांदगाव ग्रामपंचायत सदस्य विक्रांत कुबल, उदय थळे, मंजुम अप्पा घोले, अमिता पाटील, नरेश कुबल, मुबश्शीर लालसे, सचिन पाटील, गणेश गाणार, योगेश पाटील, रविंद्रनाथ खेडेकर, सुदेश घुमकर, जयंत कासार सुरेश मालवणकर, रईस घलटे, महंमद हुसेन हलडे, प्रतीक दळवी, गजानन शहापूरकर, प्रतीक पेडणेकर ,नरेश बुल्लु, शादाब हलडे, ताबिश हलडे , मंगेश शेलके, मिलिंद माळी, विनोद कांबळे, राज पवार, कौत्सुभ कासार, शामल रावजी आदी कार्यकर्ते व मतदार उपस्थित होते.

## श्री पटकादेवीचे दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात | प्रविणा घासे, प्रफुल्ल पाटील यांना उत्स्फूर्त प्रतिसाद

# वाडगावमध्ये प्रचाराचा शुभारंभ

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी|**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शेकाप महाविकास आघाडीच्या वतीने प्रचाराचा झंझावात सुरु आहे. चेंढरे जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार प्रविणा प्रमोद घासे आणि आक्षी पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार प्रफुल्ल कृष्णा पाटील यांनी वाडगाव येथे प्रचाराला सुरुवात केली. श्री पटकादेवीचे दर्शन घेऊन नारळ वाढवून प्रचाराला शुभारंभ करण्यात आला.



यावेळी आरती पाटील, अरुण पाटील, मधुकर थळे, दिपक गुरव, सुशील घासे, रवि पाटील, मारूती सुरवसे, नामदेव पाटील, ॲड. प्रसाद पाटील, कल्पना वेळे, पूर्णिमा वेळे, संजीवनी गोळे, सुजीत ठाकरे, जितेंद्र मढवी, प्रवीण बांदीवडेकर, सुनील वेंगुर्लेकर, अनंत मुळूसकर, उदय वेळे, निलेश पेडणेकर, नरेश कोळी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचाराच्या सुरुवातीला वाडगाव फाटा येथील श्री पटकादेवीचे दर्शन घेण्यात आले. त्यानंतर नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. वाडगाव येथील मतदारांच्या घरोघरी जाऊन पत्रक देऊन खटारा चिन्हा समोरील बटण दाबून मतदान करण्यात आले.प्रचाराच्या दरम्यान एक वेगळा उत्साह कार्यकर्त्यांमध्ये दिसून आला. शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो, महाविकास आघाडीचा विजय असो अशा घोषणा देत घरोघरी प्रचार करण्यात आला. प्रविणा घासे आणि प्रफुल्ल पाटील यांचे मतदारांकडून जल्लोषात स्वागत करण्यात आले. मतदारांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा विजय निश्चित असल्याचा विश्वास येथील कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# चौलच्या विकासावर बोलण्याचा नैतिक अधिकार विरोधकांनी गमावला!

**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**

चौलच्या विकासाबाबत विरोधकांनी बोलण्याचे धाडसही करू नये, असे स्पष्ट आणि परखड मत चौल ग्रामपंचायतचे उपसरपंच अजित गुरव यांनी व्यक्त केले आहे. रायगड जिल्हा परिषदेचे विरोधी पक्ष नेते सुरेंद्र म्हात्रे यांच्या पुढाकारातून जिल्हा परिषद सेस फंडाच्या माध्यमातून चौलमध्ये ऐतिहासिक आणि सर्वसमावेशक विकासकामे झाली असून, त्याचे ठोस पुरावे आज संपूर्ण गावासमोर उभे आहेत, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

चौल गायचोळे अंतर्गत रस्ता, चौल कुंडेश्वर रस्ता, चौल भगवती अंतर्गत रस्ता, चौल बीबी रस्ता, अष्टविनायक रस्ता, सराई रस्ता, चौल तुलाडदेवी टेंबी गल्ली, चौल ठाकूर आळी रस्ता, सागमाळ रस्ता, पीरांचे देऊळ ते घरत आळी रस्ता, तसेच गटारांचे काँक्रीटीकरण, बुआ दफनभूमी संरक्षण भिंत आदी असंख्य विकासकामे काही प्रमाणात स्वखर्चातून, तर काही शासकीय निधीतून पूर्णत्वास नेण्यात आली आहेत. ही सर्व कामे म्हणजे सुरेंद्र म्हात्रे यांच्या कार्यक्षम नेतृत्वाची ठळक साक्ष असल्याचे गुरव यांनी नमूद केले.



कोविड महामारीच्या अत्यंत कठीण काळात गरजू नागरिकांना धान्य वाटप, गावातील असून मुंबईत अडकलेल्या रहिवाशांसाठी राबवलेला या चिमण्यांनो परत फिरा रे हा माणुसकीचा उपक्रम, तसेच निसर्ग चक्रीवादळात नुकसानग्रस्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून शासनाकडून मदत मिळेपर्यंत केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा ही सारी कामे जिल्हापरिषदेचे विरोधी पक्ष नेते असतानाही सुरेंद्र म्हात्रे यांनी केली आहेत. फक्त आरोप नव्हे, तर जमिनीवर उतरलेला विकासच आमची ओळख आहे. त्यामुळे ज्यांनी काहीच केलं नाही, त्यांनी चौलच्या विकासावर बोलण्याआधी आत्म परीक्षण करावे, असा घणाघाती टोला अजित गुरव यांनी यावेळी विरोधकांना लगावला.



### अजित गुरवांचा घणाघाती हल्लाबोल



# सामान्य अर्थसंकल्प

निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या यंदाच्या अर्थसंकल्पात भरभरून स्वागत करावे किंवा जोरदार टीका करावी असे काही नाही. हा एक सामान्य दर्जाचा, मिळमिळीत अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पामध्ये कोणत्या गोष्टींवर भर द्यायचा आणि कोणत्या गोष्टी झाकायच्या याचा निर्णय प्रत्येक अर्थमंत्री घेत असतो. भाजपचे सरकार आल्यापासून तर अर्थसंकल्पामध्ये पाच, दहा, पन्नास वर्षांच्या योजनांची देखील चर्चा करण्याची पध्दत पाडली गेली आहे. अर्थमंत्र्यांच्या भाषणाचा पहिला भाग हा अशाच चर्चेसाठी खर्ची पडत असतो. शेती, रस्ते, धरणे यात आम्ही पुढच्या पाच वर्षात इतका खर्च करणार आहोत किंवा अशा संस्था उभारणार आहोत अशा तपशीलांची त्यात भरमार असते. अर्थसंकल्पामध्ये वास्तविक गेल्या अर्थसंकल्पामध्ये काय ठरवले होते, काय साध्य झाले, जे झाले नाही ते का झाले नाही आणि यंदाची दिशा काय हेच बोलले जायला हवे. उदाहरणार्थ गेल्या वर्षी बिहारची निवडणूक तोंडावर असल्याने बिहारमधील मखाना शेतीला इतके करोड आणि तिथल्या स्वयंरोजगाराला तितके करोड असा बारीकसारीक तपशील होता. त्याहीपूर्वी एक वर्ष जलसंधारणाच्या योजनांवर भर होता. एक वर्ष आरोग्य, एक वर्ष शेती अशा विषयांवर भाराभर आकडेवारी आणि योजनांची लयलूट होती. या सर्व संकल्पांचे पुढे काय झाले याचा नंतर काहीही पत्ता लागत नाही. यंदा त्यातल्या त्यात बरी गोष्ट अशी की, येत्या काळात बंगाल, तमिळनाडू, केरळ इत्यादी राज्यांच्या निवडणुका असूनही त्या राज्यांवरच निव्वळ भर देऊन काहीही योजना आणलेल्या नाहीत. कदाचित ही विरोधी पक्षांची राज्ये आहेत व तिथे आपली सत्ता येणे कठीण आहे असा विचार करून हा बदल केला गेला असेल. पण मुद्दा असा की, असल्या संदिग्ध चर्चा आणि घोषणांनी लोकांना प्रत्यक्षात काहीच मिळत नाही. तरीही जित्याची खोड जात नसतेच. त्यामुळे यंदाच्या भाषणातही हायस्पीड रेल्वेमार्ग, जलमार्ग, प्रत्येक राज्यात केमिकल पार्कची उभारणी, आयुर्वेदिक औषधे, योग इत्यादींमधून पैसे कमावण्याच्या योजना असे स्वप्नरंजन केलेले आहेच. ते ऐकून एखाद्याला हे सर्व येत्या वर्षभरात घडायचे आहे असा समज होतो. पण ती सगळी दूरची कहाणी आहे. पुढच्या वर्षी दुसरी नवी गोष्ट येणार आहे. तोवर तुम्ही ही विसरून जाणार आहात.

### छोटे दिलासे

मध्यमवर्गीयांना अर्थसंकल्पामध्ये प्राप्तिकराचे दर कमी झाले का याची उत्सुकता अधिक असते. पण गेल्याच वर्षी जवळपास १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यात आल्यामुळे यंदा करांच्या दरात काहीही बदल होण्याची शक्यता नव्हती. तसेच झाले. प्राप्तिकर परतावा दाखल करण्याच्या मुदतीत केलेली वाढ वगळता या कराबाबत अर्थमंत्री फार काहीही बोललेल्या नाहीत. अलिकडे कररचनेतील केवळ महत्वाचे तपशील सांगून बाकी प्रत्यक्ष अर्थसंकल्पाच्या भाषणामधून लोकांनी वाचावे असे सांगितले जात असते. यंदा मात्र अर्थमंत्र्यांनी करांमध्ये बदलांचे भाराभर तपशील सांगितले, ज्यावरून प्रत्यक्ष त्या धंद्यात असणाऱ्यांखेरीज इतरांना काहीही अर्थबोध होऊ नये. उदाहरणार्थ, निर्यात केल्या जाणाऱ्या बुटांसाठी जो माल आयात केला जाईल त्यावरचे आयातशुल्क माफ आहे किंवा मायक्रोवेव्ह ओव्हन्समधील काही भागांवरचे आयातशुल्क काढून टाकण्यात आले आहे अशा घोषणांमुळे ते उत्पादन करणाऱ्यांना किंवा ग्राहकांना नेमका किती फायदा होणार आहे याचा काहीच अंदाज येत नाही. छोट्या व मध्यम उद्योगांसाठी दहा हजार कोटी रुपये व आत्मनिर्भर भारतासाठी दोन हजार कोटी रुपयांचा निधी उभारण्याची घोषणा करण्यात आली. पण हा जुन्याच योजनांचा भाग असावा. शिवाय इतक्या प्रचंड भारतासाठी इतका कमी निधी काय उपयोगाचा ठरणार हाही प्रश्न आहेच. कर्करोगावरच्या १७ औषधांवरचे आयातशुल्क हटवल्यामुळे रुग्णांना चांगला फायदा होईल. याच रीतीने काही गंभीर आजारांवर केवळ परदेशातच मिळणाऱ्या औषधांवरचा आयातकर काढल्याने तीही स्वस्त मिळतील. मात्र अशा स्वरुपात लोकांना छोटे दिलासे देऊन महत्वाच्या व गंभीर समस्यांबाबत मात्र मौन बाळगण्यात आले आहे. उदाहरणार्थ, परदेशातून येणारी औषधे स्वस्त होतील हे चांगले आहे. पण गरिबांना होणाऱ्या दुखण्यांमध्ये किंवा शस्त्रक्रियांसाठी लागणारी देशातील बाजारपेठेतली औषधे प्रचंड महाग आहेत त्याविषयी हे सरकार काहीही करायला तयार नाही.

### दडवलेल्या गोष्टी

शेतीच्या बाबतीत नारळ, कोको, काजू या कोकण ते केरळमधील पिकांच्या संशोधनासाठी पैसे दिले जाणार आहेत. तशा संशोधन संस्थाही स्थापन होणार आहेत. विविध किडी व रोगांमुळे नारळाचे पीक गेल्या काही वर्षांपासून संकटात आहे. यंदा तर हे पीक इतके घटले की त्यामुळे खोबरेल तेलाच्या किमती विक्रमी पातळीवर गेल्या. या पिकाला खरोखरच मदतीची गरज आहे. मात्र ते केवळ केरळची निवडणूक समोर ठेवून दिलेले आश्वासन असेल तर कठीण आहे. काश्मीर, हिमाचल वगैरे भाग तसेच ईशान्य राज्यांमध्ये अक्रोड, बदाम इत्यादींच्या वाढीवर लक्ष दिले जाणार आहे. ते स्वागतार्ह आहे. मात्र देशातील अन्नधान्य पिकवणारा शेतकरी तोट्यातील शेतीमुळे बरबाद होतो आहे. सोयाबीन, कापूस, तूर इत्यादी पिकांना हमीभावाइतकाही दर मिळत नाही. गेल्या वर्षी प्रचंड कापूस तयार होऊनही सरकारने आयात कापसावरची बंधने हटवली. देशातील कापड उद्योगाच्या दबावामुळे हे करण्यात आले. सोयाबीन व मक्याचे उत्पादन वाढत असूनही त्याच्यावर प्रक्रियेची पुरेशी सोय केली जात नाही. आंबा शेतकरी सर्व बाजूंनी अडचणीत आहे. शेतीधंदा कधी नव्हे इतका बेभरवशाचा झाला आहे. पण याबाबत अर्थसंकल्पामध्ये काहीही दिलासा नाही. अनेकदा घोषणांकडे पाहताना सरकारला काय सांगायचे आहे हे दिसण्यापेक्षा सरकार काय दडवत आहे हेच अधिक वेगाने समोर येते. उदाहरणार्थ, आयुर्वेद, योग इत्यादी गोष्टींशी संबंधित अनेक योजना या अर्थसंकल्पात आहेत. आयुर्वेदिक उत्पादने विकून परदेशातून पैसे मिळवता येतील असे गाजर यात दाखवलेले आहे. पण मुळात देशातील विज्ञान, तंत्रज्ञान किंवा संशोधनाची वाट लागलेली आहे. खुद्द आयुर्वेदातही नवीन संशोधन बंद आहे. या स्थितीत बनावट उत्पादने काढून लोकांना फसवण्याचाच हा प्रकार आहे अशी शंका वाटते. देशातील मेडिकल टूरिझम वाढवण्यावर भर दिला जात आहे. परदेशांच्या मानाने स्वस्त व प्रत्यक्षात महागच असे उपचार करण्यासाठी पंचतारांकित इस्पितळे त्या निमित्ताने उभी राहतील. परकीय चलन मिळवून देतात म्हणून त्यांना सवलतीही दिल्या जातील. पण सामान्य माणसाला परवडणारे उपचार देण्याच्या सरकारच्या जबाबदारीचे काय हा प्रश्न बाजूला पडतो आहे. पर्यटन क्षेत्रात काम करण्यासाठी दहा हजार गाईड्स तयार केले जाणार आहेत. पण मुळात आपल्याकडचे गडकिल्ले, समुद्रकिनारे किंवा पर्यटनस्थळे यांची आणि त्यांच्याकडे जाणाऱ्या रस्त्यांची अवस्था भीषण आहे. त्याबद्दल सरकार काहीही करायला तयार नाही. संरक्षणावरच्या खर्चातील तीन टक्के वाढ व भांडवली खर्चात वाढ करून १२.२० लाख कोटींवर नेणे हाही खासगी कंपन्यांच्या फायद्याचाच सौदा आहे. त्यांनाच यातून भरपूर लाभाची कंत्राटे मिळणार आहेत.

---

**विचार**

# अमेरिका-क्युबादरम्यान शत्रुत्त्व का?

***व्हेनेझुएलामध्ये सत्तेचा आणि ताकदीचा नंगा नाच केल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आता क्युबाकडे वाकड्या नजरेने पहात आहेत. ट्रम्प यांनी क्युबाला 'करार करा, अन्यथा परिणामांना सामोरे जा' असा इशारा दिला आहे. अमेरिका आणि क्युबा यांच्यात संघर्ष का आहे आणि अमेरिका क्युबासारख्या छोट्या देशाला इतके महत्त्व का देत आहे, याचा हा मागोवा.***



**प्रा.जयसिंग यादव**

व्हेनेझुएलामध्ये लष्करी कारवाई केल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प शांत बसलेले नाहीत. त्यांचे जगातील अनेक देशांकडे लक्ष असले, तरी दक्षिण अमेरिकेतील क्युबा त्यांच्या डोळ्यात जास्त सलतो आहे. क्युबासारख्या छोट्या देशाने अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राला झुंजवत ठेवले आहे. रशिया आणि चीनशी क्युबाचा वाढत चाललेला दोस्ताना अमेरिकेला खुपतो आहे. त्यामुळे व्हेनेझुएलानंतर अमेरिकेने क्युबाकडे आपली वक्रदृष्टी वळवली आहे. इराण आणि ग्रीनलँडनंतर अमेरिका क्युबाविरोधात मोहीम उघडू शकते. ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर लिहिले, की अनेक वर्षांपासून व्हेनेझुएलाकडून मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या तेल आणि पैशांवर क्युबा अवलंबून होता. त्या बदल्यात क्युबाने व्हेनेझुएलाच्या शेवटच्या दोन हुकूमशहांना 'सुरक्षा सेवा' पुरवल्या; पण आता नाही. गेल्या आठवड्यात व्हेनेझुएलावर अमेरिकेच्या हल्ल्यादरम्यान, तेथे उपस्थित असलेले बहुतेक क्युबन लोक मारले गेले. व्हेनेझुएलाला आता इतके वर्षे ओलीस ठेवणाऱ्या गुंड आणि खंडणीखोरांपासून संरक्षणाची गरज नाही, असे नमूद करून ट्रम्प यांनी लिहिले, की व्हेनेझुएलाकडे आता जगातील सर्वात शक्तिशाली सैन्य असलेल्या अमेरिकेकडे त्यांचे संरक्षण आहे. क्युबाला आता तेल किंवा पैसा पाठवला जाणार नाही. मी सुचवतो, की त्यांनी खूप उशीर होण्यापूर्वी करार करावा. अमेरिका भारतासह अन्य देशांवर व्यापारी करार करण्यासाठी कसा दबाव आणते, याचे हे ज्वलंत उदाहरण.

पश्चिम गोलार्धातील देशांकडे अमेरिकेचे नेहमीच लक्ष राहिले आहे. या देशांमध्ये आणखी कोणताही हस्तक्षेप होऊ नये, असे अमेरिका इच्छिते. तथापि, रशिया आणि चीनशी क्युबाचे चांगले संबंध अमेरिकेला मान्य नाहीत. ट्रम्प रशियाला मोठा धोका मानत नाहीत. सध्या ते चीनला मोठा धोका मानतात. त्यांना पश्चिम गोलार्धातील चीनचा प्रभाव संपवायचा आहे. ट्रम्प हे क्युबाबाबत कठोर भूमिका घेणारे एकमेव अमेरिकन अध्यक्ष नाहीत. क्युबा आणि अमेरिकेतील स्पर्धा अनेक दशकांपासून सुरू आहे. १८९८ मध्ये अमेरिकेने स्पेनचा पराभव केला. त्यानंतर स्पेनने क्युबावरील सर्व दावे सोडून दिले आणि ते अमेरिकेने सुरु केले. १९०२ मध्ये क्युबाला स्वातंत्र्य मिळाले आणि टॉमस एस्ट्राडा पाल्मा त्याचे पहिले अध्यक्ष झाले; परंतु प्लॅट सुधारणांमुळे हा देश अमेरिकेच्या संरक्षणाखाली राहिला. त्यामुळे अमेरिकेला क्युबाच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार मिळाला. काही वर्षांनंतर एस्ट्राडा यांनी राजीनामा दिला आणि जोसे मिगुएल गोमेझ यांच्या नेतृत्वाखाली बंड झाल्यानंतर अमेरिकेने क्युबा ताब्यात घेतला. अमेरिकेच्या देखरेखीखाली क्युबामध्ये १९०९ मध्ये निवडणुका झाल्या आणि जोसे मिगुएल गोमेझ अध्यक्ष झाले; परंतु लवकरच भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये अडकले. १९१२ मध्ये वांशिक भेदभावाविरुद्ध कृष्णवर्णीय निदर्शने दडपण्यासाठी अमेरिकन सैन्य क्युबाला परतले. १९३३ मध्ये क्युबन लष्करी अधिकारी फुलगेन्सियो बतिस्ता यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बंडाने जेरार्डो मचाडो यांना उलथवून टाकले.

१९५३ मध्ये फिडेल कॅस्ट्रो यांनी बतिस्ता राजवटीविरुद्ध अयशस्वी बंड केले. 'कौन्सिल ऑफ फॉरेन रिलेशन्स' (सीएफआर) च्या अहवालात म्हटले आहे, की अमेरिका आणि क्युबामधील शत्रुत्वाचा खोल पाया १९५९ मध्ये घातला गेला, जेव्हा फिडेल कॅस्ट्रो यांनी क्युबामधील अमेरिकासमर्थित सरकार उलथून टाकले. सुरुवातीला अमेरिकेने नवीन सरकार स्वीकारले; परंतु क्युबाने अमेरिकेचा कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या सोव्हिएत रशियाशी जवळचे संबंध निर्माण करण्यास सुरुवात करत व्यापार सुरू केला, तेव्हा अमेरिका संतप्त झाली. क्युबाने अमेरिकन कंपन्यांची मालमत्ता जप्त केली आणि अमेरिकन वस्तूंवर जास्त कर लादले. कॅस्ट्रोंच्या आगमनानंतर क्युबामध्ये समाजवादाची लाट आली, तर अमेरिका भांडवलशाही धोरणाचा अवलंब करत होती. क्युबा चीनशी चांगले संबंध विकसित करू शकेल, अशी शक्यताही होती, म्हणूनच अमेरिकेने क्युबाविरुद्ध कठोर भूमिका स्वीकारली. अमेरिकेने क्युबाला आर्थिकदृष्ट्या शिक्षा करण्यास सुरुवात केली. क्युबाकडून साखर खरेदी कमी केल्यानंतर अमेरिकेने क्युबाला जवळजवळ सर्व वस्तू पाठवणे बंद केले. अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी याचे रूपांतर 'संपूर्ण आर्थिक निर्बंध' मध्ये केले आणि कठोर प्रवास निर्बंध लादले. १९६१ मध्ये अमेरिकेने क्युबामध्ये फिडेल कॅस्ट्रोंचे सरकार उलथवून टाकण्यासाठी लष्करी कारवाई सुरू केली. तथापि, ही कारवाई अयशस्वी झाली.

'बे ऑफ पिग्ज आक्रमण' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या घटनेत अमेरिकेने क्युबन बंडखोर आणि निर्वासितांविरुद्ध बळाचा वापर केला होता. त्यांनी आधीच पकडलेल्यांना लष्करी प्रशिक्षण आणि निधी पुरवला. क्युबन सरकार उलथवून टाकण्यासाठी हल्ला करण्यात आला; परंतु स्थानिक लोकसंख्येच्या पाठिंब्याअभावी अमेरिका आणि क्युबन बंडखोर अयशस्वी झाले. अमेरिकेचे हवाई समर्थन उपलब्ध नसल्याने क्यबाने अवघ्या तीन दिवसांमध्ये बंड चिरडून टाकले. त्या वेळी केनेडी यांच्या नेतृत्वाखाली अमेरिका सत्तेत होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेची प्रतिमा खराब झाली. यानंतर क्युबाने सोव्हिएत महासंघाला त्याच्या भूभागावर गुप्तपणे अणु क्षेपणास्त्रे बसवण्याची परवानगी दिली. ऑक्टोबर १९६२ मध्ये अमेरिकन विमानांनी ही क्षेपणास्त्रे पाहिली. त्यानंतर अमेरिका आणि सोव्हिएत महासंघातील तणाव १३ दिवस टिकून राहिला. परिस्थिती अणुयुद्धाच्या जवळ आली होती. शेवटी, सोव्हिएत नेते निकिता ख्रुश्चेव्ह क्षेपणास्त्रे काढून टाकण्यास सहमत झाले. त्या बदल्यात, केनेडीने क्युबावर हल्ला न करण्याचे आणि तुर्कीमधून अमेरिकन क्षेपणास्त्रे काढून टाकण्याचे आश्वासन दिले. तथापि, दोन्ही देशांमधील तणाव कमी झाला नाही.

पुढील काही दशकांपर्यंत अमेरिकेने क्युबाला आर्थिक आणि राजनैतिकदृष्ट्या वेगळे केले. अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी १९८२ मध्ये क्युबाला 'दहशतवाद्यांना पाठिंबा देणारा' देश म्हणून घोषित केले. नंतर जॉर्ज बुश आणि बिल क्लिंटन यांनी हेल्म्स-बर्टन कायदा लागू केला.

या कायद्यानुसार क्युबामध्ये लोकशाही स्थापित होईपर्यंत आणि कॅस्ट्रो कुटुंबाला सत्तेवरून काढून टाकल्याशिवाय निर्बंध उठवले जाणार नाहीत, असे म्हटले. बराक ओबामा यांच्या कार्यकाळात क्युबाशी अमेरिकेचे संबंध सुधारले. त्यांनी क्युबाबद्दल काहीशी उदारता दाखवली. 'सीएफआर'च्या अहवालानुसार २००८ च्या निवडणुकीदरम्यान ओबामा म्हणाले, की क्युबाला वेगळे केल्याने काहीही चांगले झाले नाही. ओबामा सत्तेत आल्यानंतर क्युबावरील प्रवासी बंधने आणि पैसे पाठवण्याचे नियम शिथिल करण्यात आले. २०१४ मध्ये एका घटनेने संपूर्ण जगाला धक्का बसला. ओबामा आणि क्युबाचे नेते राऊल कॅस्ट्रो यांनी अचानक घोषणा केली, की दोन्ही देश राजनैतिक संबंध पुन्हा स्थापित करतील. त्यानंतर क्युबाला 'दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या' देशांच्या यादीतून काढून टाकण्यात आले. २०१६ मध्ये ओबामा यांनी वैयक्तिकरित्या क्युबाला भेट दिली. १९२८ नंतर अमेरिकेच्या अध्यक्षांचा क्युबाचा हा पहिलाच दौरा होता. ट्रम्प यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात प्रवेश करताच क्युबाबद्दल कठोर भूमिका घेतली, तर बायडेन थोडेसे उदार राहिले. आपल्या पहिल्या कार्यकाळात त्यांनी ओबामा प्रशासनाचे बहुतेक निर्णय उलटवले. ट्रम्प यांनी क्युबाच्या लष्कराशी संबंधित कंपन्यांशी व्यापार थांबवला, एकट्याने प्रवास करण्यास बंदी घातली आणि क्रूझ जहाजे आणि बहुतेक उड्डाणे थांबवली.

२०१९ मध्ये ट्रंप यांनी पुन्हा क्युबाला दहशतवाद्यांना पाठिंबा देणारा देश घोषित केला. या काळात क्युबामधील अमेरिकन आणि कॅनेडियन दूतावासातील कर्मचाऱ्यांना असामान्य दुखापती झाल्या. त्यात श्रवणशक्ती कमी होणे आणि मानसिक समस्यांचा समावेश होता. नंतर याला 'हवाना सिंड्रोम' असे नाव देण्यात आले. यानंतर, अमेरिकेने क्युबाची राजधानी हवाना येथून आपल्या दूतावासातील बहुतेक कर्मचाऱ्यांना माघारी बोलावले. या हल्ल्यांमध्ये क्युबन सरकारचा सहभाग असल्याचा संशय होता; परंतु क्यूबाने हे नाकारले. त्यांनी अमेरिकेला राजनैतिक संबंध तोडू नये, असे आवाहनही केले. बायडेन यांच्या काळात काही नियम शिथिल करण्यात आले. त्यामुळे क्युबामधील कुटुंबांना अधिक पैसे पाठवता आले आणि क्युबाला अधिक विमान उड्डाणे सुरू झाली. त्यानंतर २०२१ मध्ये अन्न, औषध आणि विजेच्या कमतरतेमुळे त्रस्त असलेल्या क्युबन लोकांनी निषेध करण्यास सुरुवात केली. सरकारने निदर्शकांना अटक केली आणि इंटरनेट बंद केले. बायडेन प्रशासनाने क्युबावर नवीन निर्बंध लादले. क्युबातील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत गेली. लोक मोठ्या संख्येने अमेरिकेत पळून जाऊ लागले. व्हेनेझुएलाच्या घटनेनंतर ट्रम्प यांचे कोणतेही विधान हलक्यात घेणे चुकीचे ठरेल.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

---

# नवमतदारांच्या हातात लोकशाहीची मोठी ताकद

प्रत्येक निवडणुकीत एक खास वर्ग सर्वांचे लक्ष वेधून घेतो तो म्हणजे तरुण मतदारांचा वर्ग. नुकतच १८ वर्ष पूर्ण केलेले आणि पहिल्यांदाच मतदानासाठी सज्ज झालेले हे नवं मतदार लोकशाहीच्या प्रक्रियेत एक नवी ऊर्जा घेऊन येतात. नव्याने मिळालेला मतदानाचा हक्क आणि देशाचा जबाबदार नागरिक म्हणून पहिल्यांदाच मतदान करण्याचा अनुभव हा प्रत्येक तरुणासाठी विशेष असतो. पहिल्यांदा मतदान करणारा तरुण थोडा गोंधळलेला असतो पण तेवढाच जागरूकही असतो. हेच तरुण पुढे जाऊन लोकशाहीचा महत्त्वाचा आधार बनणार आहेत. त्यामुळे १८ वर्ष पूर्ण होताच मिळणारा मतदानाचा हक्क हा केवळ अधिकार नसून एक मोठी जबाबदारी मानली जाते.

पहिल्यांदा मतदान करणाऱ्या तरुणांमध्ये एक वेगळाच उत्साह दिसून येतो. आजची तरुण पिढी उच्च शिक्षित, डिजिटल आणि माहितीपूर्ण आहे. सोशल मीडियामुळे त्यांना देशातील घडामोडींची सतत माहिती मिळते. त्यामुळे त्यांच्या मतदानाचा परिणाम थेट देशाच्या भविष्यात दिसून येतो. तरुण पिढी ही देशाचं भविष्य आहे आणि त्यांनी वेळोवेळी हे सिद्ध केलं आहे. आजचा तरुण कोणत्याही क्षेत्रात मागे नाही मग ते शिक्षण, उद्योग, क्रीडा असो किंवा राजकारण. याची प्रचिती अलीकडील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही पाहायला मिळाली. महाराष्ट्रात २१ ते २२ वर्षांच्या तरुणांनी नगराध्यक्षपदासारखी जबाबदारी स्वीकारली आहे. यावरून स्पष्ट होत, की तरुण मंडळी केवळ मतदार म्हणून नाहीतर थेट नेतृत्व स्वीकारण्यासाठी पुढे येत आहेत. त्याचबरोबर ७ जानेवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत निवडणुकीतदेखील अनेक तरुण उमेदवार आपला नशीब आजमावत आहेत. यातूनच सिद्ध होत आहे कि तरुण मंडळी थेट राजकारणात उतरून बदलाचा दिशेने वळत आहे व स्वतःसारख्या असंख्य तरुणांना प्रेरणा देत आहेत.

तरुण मतदारांची भूमिका केवळ मतदानापुरती मर्यादित नाही. ते प्रश्न विचारतात, माहिती



**वैष्णवी वाडकर**

पडताळतात आणि बदलाची अपेक्षा ठेवतात. एवढाच नव्हे तर अन्याय विरुद्ध आवाज देखील उठवतात. आजुबाजूला सुरु असणाऱ्या घडामोडींवर तरुण मतदारांचे लक्ष आहे. त्यामुळे त्यांचे मतदान भावनेवर नाही तर विचारावर आधिरीत असल्याचे सांगितले जाते. रायगड जिल्ह्यात २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत १८ ते १९ वयोगटातील साधारणतः ५१,६१२ नवमतदार नोंदले गेले होते. हा आकडा केवळ संख्या नसून जिल्ह्याच्या भविष्यातील राजकीय दिशेला आकार देणारी एक मोठी शक्ती आहे. या नवमतदारांमुळे निवडणूक प्रक्रियेत नवा विचार, नव्या अपेक्षा आणि नव्या पिढीचा आवाज स्पष्टपणे ऐकू येईल.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मानला जातो. त्यामुळे रस्तेदुरुस्ती, कचराव्यवस्थापन, बेरोजगारी आणि वाहतूककोंडी या रायगड जिल्ह्यातील महत्वाचा समस्या आहेत. या समस्यांवर सातत्याने नागरिकांसह तरुण नागरिकांनी आवाज उठवला आहे. त्यामुळे स्थानिक विकास, योग्य कचरा व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन, रोजगार निर्मिती, रस्तेदुरुस्ती आणि पायाभूत सुविधा हे तरुण मतदारांसाठी अत्यंत महत्वाचे मुद्दे ठरत असल्याचे मत व्यक्त होत आहे. पहिल्यांदा मतदान करणारा तरुण बदलाची आशा ठेऊन मतदान करणार आहे. रायगड जिल्ह्यातील नवमतदार ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांतून येतात. त्यामुळे त्यांच्या समस्या आणि अपेक्षा वेगवेगळ्या असल्या तरी उद्दिष्ट एकच आहे. चांगलं प्रशासन आणि प्रामाणिक नेतृत्व. तरुण मतदार स्थानिक प्रश्नांकडे विशेष लक्ष देतोय. पाणी, शेती, वाहतूक, नोकऱ्या आणि शिक्षण या मुद्द्यांशी त्याचा थेट संबंध असल्याने तो अधिक सजगपणे मतदान करणार असल्याची चर्चा तरुणवर्गात होत आहे.

पहिल मतदान हा प्रत्येक तरुणाच्या आयुष्यातील एक महत्वाचा अनुभव असतो. मतदान केंद्राबाहेर काढलेला फोटो किंवा शाईचा डाग ही केवळ आठवण नसून जबाबदारीची जाणीव करून देणारी खून आहे. कारण आजचा नवमतदार उद्याच विकासाच भविष्य ठरवणार आहे. त्यामुळे निवडणूक ही केवळ राजकीय लढत नसून समाजाच्या प्रगतीची प्रक्रिया आहे. रायगड जिल्ह्यातील हजारो पहिल्यांदा मतदान करणारे तरुण या प्रक्रियेला नवी दिशा देत आहेत. त्यांचा मतदानातील सहभाग लोकशाही अधिक मजबूत करणार आहे. जितका तरुणांचा सहभाग वाढेल, तितकं प्रशासन अधिक जबाबदार आणि भविष्य अधिक सक्षम होईल. रायगडच्या विकासाचा खरा पाया आजच्या नवमतदार तरुणांच्या हातात आहे आणि हीच लोकशाहीची सर्वात मोठी ताकद आहे.

---

**लोकसंसद**

## सुनेत्रा पवार, महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री

विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दुर्दैवी निधन झाल्यानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्रीपद पुन्हा एकदा चर्चेच्या अग्रस्थानी आले. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना ७ मार्च १९७८ रोजी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतलेले नाशिकराव तिरपुडे हे महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री झाले होते. त्यानंतर सर्वश्री सुंदरराव सोळंके, रामराव आदिक, गोपीनाथ मुंडे, छगन भुजबळ (दोनदा), विजयसिंह मोहिते-पाटील, आर.आर.पाटील, अजित पवार (सहावेळा), देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यानंतर महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणाऱ्या त्या अकराव्या उपमुख्यमंत्री ठरल्या. तसेच संपूर्ण देशात प्रथमच ६ ऑगस्ट १९९६ रोजी पंजाबच्या राजिंदर कौर भट्टल यांनी पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर जमुना देवी (मध्यप्रदेश), कमला बेनीवाल (राजस्थान), पामुला पुष्पा श्रीवाणी (आंध्रप्रदेश), रेणू देवी (बिहार), दिया कुमारी (राजस्थान) आणि प्रवती परिदा (ओडिशा) यांच्यानंतर महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणाऱ्या सुनेत्रा पवार या देशातील आतापर्यंतच्या केवळ आठव्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. वास्तविक भारताच्या संविधानात कुठेच 'उपमुख्यमंत्री' या पदाचा उल्लेख नाही. त्यामुळे हे असंवैधानिक पद असून देखील आघाड्यांच्या राजकारणातून सत्तेत आलेले सरकार स्थिर राखण्यासाठी उपमुख्यमंत्री हे एक महत्त्वाचे पद ठरले आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**दिनविशेष**

# जागतिक पाणथळ दिन

आज (दिनांक ०२ फेब्रुवारी) हा जागतिक पाणथळ दिन. पर्यावरणासाठी, त्याच्या संतुलनासाठी पाणथळ जागांचे महत्त्व मोठे आहे. पाणथळ प्रदेशांचे संवर्धन आणि व्यवस्थापनासाठी केंद्र सरकार आणि राज्य शासन अनेक पावले उचलत आहेत. त्यामुळे या जागांचे पर्यावरणीय स्वरूप जतन केले जात आहे. राज्यातील अनेक जागा या रामसर परिषदेच्या निकषांनुसार पात्र ठरतात. अर्थात, अशा आंतरराष्ट्रीय मानकांनुसार रामसर स्थळ म्हणून घोषित होणे पुरेसे नाही. त्यानंतर त्या वारसा स्थळांचा दर्जा टिकवून ठेवणे, त्यांचे संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे आहे. रामसर स्थळांचे जतन आणि संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकांचे ते कर्तव्य आहे. वैयक्तिक पातळीवर त्याचे जतन करणे, किमान त्यांना आपण हानी पोहोचवणार नाही याकडे लक्ष देणे, प्रबोधन या माध्यमातून ही जागरुकता येऊ शकेल!

नैसर्गिकरित्या एखादया जागेत पाणी साचून किंवा काही कालावधीसाठी पाणी तसेच राहून पाणथळ जमिनी तयार होतात. निसर्गतः येणारे पूर, त्यातून पाण्याचा निचरा लवकर न होता पाणी साचून राहणे किंवा नद्यांच्या खाड्या हे याचे उत्तम उदाहरणे आहेत.

धरणाचे जलाशय, शेततळी, मिठागरे अशी मानवनिर्मित रामसर स्थळांची उहाहरणे देता येतील. जमा होणाऱ्या पाण्याच्या स्त्रोतावरून सुद्धा पाणथळ जागांचे वर्गीकरण करतात. गोड्या/खाऱ्या पाण्यामुळे, लाटांमुळे तयार झालेले, लाटा आणि नदीचे गोडेपाणी यांच्या मिश्रणातून तयार झालेले, नद्यांना येणारे पूर, पावसाचे पाणी साचून तयार झालेले, मानवी हस्तक्षेपामुळे पाणी साचून तयार झालेले यांचा यामध्ये समावेश होतो.

अनेक पाणथळ जागांमध्ये पाण्याचे स्त्रोत हे एकापेक्षा अधिक असतात. त्यामुळे त्यांचे वर्गीकरण ठराविक अशा एका प्रकारात करता येत नाही. आंतरराष्ट्रीयस्तरावर विस्तीर्ण/प्रचंड आकाराच्या रामसर स्थळांची उदाहरणे म्हणजे अमेझॉन नदीचे खोरे. पश्चिम सैबेरिया, द. अमेरिकेतील पेंटावाल आणि आपल्या भारतातील सुंदरबन ही त्याची उदाहरणे होत.

पर्यावरणासाठी, त्याच्या संतुलनासाठी पाणथळ जागांचे महत्व मोठे आहे. वस्तूतः पाणथळ जागा या जमीन आणि पाणी यांचे समन्वय साधणाऱ्या असतात. केवळ पशुपक्षी नव्हे तर विविध लव्हाळी, हवा/ऑक्सजिन याच्या पोकळ्या असणाऱ्या वनस्पती, त्यांच्या आधाराने राहणारे सजीव आणि डोळ्यांना न दिसणारे सूक्ष्मजीव, एकपेशीय जीव यांनी पाणथळ जागा समृद्ध असतात. बहुतांश खाड्यांमध्ये विविध खारफुटी वनस्पती असतात.

मुख्यतः पूर नियंत्रणासाठी याचा फायदा होतो. नदीला आलेला पूर किंवा समुद्राच्या लाटा यांपासून जवळच्या जमिनीचे संरक्षण पाणथळ जागांमुळे होते. बहुतांश पाणथळ जागा या भूजलाशी जोडलेल्या असतात. त्यामुळे या पाण्याची गुणवत्ता आणि दर्जा राखण्यात या पाणथळ जागा महत्वाची भूमिका बजावतात. भूजल पातळी पुनर्भरणाचे करण्याचे काम या माध्यमातून होते. कांदळवन, प्रवाळ, आणि मीठ दलदलीचा प्रदेश हे किनारा संरक्षण आणि वादळापासून बचावाचे काम करतात. जैवविविधता जपण्याचे काम यातून होते.

गेल्या काही वर्षामध्ये वाढते औद्योगिकीकरण, भूजलाचा बेसुमार उपसा आणि त्याच्या पुनर्भरणासाठी होणाऱ्या प्रयत्नांची गती कमी असणे, आणि महत्वाचे म्हणजे घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी अशा पाणथळ जागांचा वापर यामुळे त्या आक्रसण्याची भीती आहे. याचा परिणाम त्यांची जैवउत्पादकता आणि जैवविविधता यांवर होऊ शकतो. ते जपणे आपल्या सर्वांच्या हाती आहे.

# सर्व्हिस रोड खचल्याने ट्रक अडकला

## • रविवार असल्याने वाहतूक कोंडी, कोकणात जाणाऱ्या गाड्यांच्या रांगा




**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गाचा वनवास काही संपता संपत नाही. मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या १४ वर्षांपासून रखडलेले आहे. कोकणच्या विकासाचा मार्ग म्हणून पाहिला जाणाऱ्या या रस्त्याचे काम बहूतांशी पूर्ण झाले असले तरी महामार्गावरील उड्डाणपुलांची काम अपूर्ण तर बायपासची काम पुर्णपणे ठप्प आहेत. यामुळे मुंबई-गोवा महामार्गाचे काम कधी पूर्ण होईल याची प्रतिक्षा नागरिकांना आहे.

त्यातच मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम नागोठणे हायवे नाका परिसरात सध्या जोरात सुरू आहे. हायवे नाका व रेल्वे स्थानक समोरील महामार्गावर उड्डाण पुलाच्या भरावाचे कामही सध्या जोरात सुरू आहे. त्यामुळे येथील महामार्गाच्या दोन्ही बाजूला असलेल्या सर्व्हिस रोडवर वाहतूक वाढली आहे. असे असतांनाच हायवे नाका येथील महामार्गालगत असलेल्या हॉटेल कल्पतरू समोरील सर्व्हिस रोडवर निकृष्ठ दर्जाच्या कामामुळे रस्ता खचल्याने त्या ठिकाणी एक अवजड वाहतूक करणारा ट्रक अडकून राहिल्याची घटना शनिवारी (दि.३१) रात्री घडली आहे. तद्नंतर रविवार दिनांक १ फेब्रुवारी रोजी सकाळी या खचलेल्या रस्त्यामधून ट्रकला बाहेर काढण्यात आले आहे. त्यानंतर या रस्ता खचलेल्या ठिकाणी थातूर मातुर पद्धतीने मलमपट्टी करण्यात आली आहे.

रविवार सुट्टीचा दिवस असल्याने कोकणात फिरायला जाणाऱ्या गाड्यांची मुंबई-गोवा महामार्गावर महाड बाजूकडे मोठी वर्दळ होती. या गाड्यांना अडकलेल्या ट्रकमुळे वाहतुकीसाठी अडथळा निर्माण झाला होता. त्यामुळे महाड बाजूकडे जाणाऱ्या गाड्यांची या सर्व्हिस रोडवर लांब रंग लागली होती. दरम्यान, हा ट्रक जर कल्पतरू हॉटेलच्या बाजूला कलंडला असता तर मोठा अनर्थ घडला असता असे बोलले जात आहे.

### उत्तम कामाची मागणी

महामार्ग चौपदरीकरण कामाचे ठेकेदार असलेल्या कल्याण टोल प्लाझाच्या अधिकाऱ्यांनी महामार्ग चौपदरीकरणातील कोणतीही कामे करतांना ती चांगल्या दर्जाची करावी आणि भविष्यातील अपघात टाळावेत अशी मागणी वाहन चालक व स्थानिक नागरिकांतून करण्यात येत आहे.

## मच्छीमार्केटमध्ये ग्राहकांचा शुकशुकाट

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

निसर्गाच्या कोपामुळे गेले महिनाभर जिल्ह्यातील मच्छीमारांना मासळीच मिळेनाशी झाली आहे. त्यामुळे स्थानिक मच्छीमार आर्थिक अडचणींमुळे मेटाकुटीला आला आहे. याचा परिणाम म्हणून रविवारी मासळीचे दर चढे असल्याने मच्छीमार्केटमध्ये खवय्यांची वानवा होती. पौर्णिमेच्या अगोदरचे आणि नंतरचे काही दिवस मासळी स्थलांतरीत होते. दरवर्षीचा हा अनुभव आहे. पौर्णिमेचा मासे न मिळण्याचा परिणाम ओसरत असतानाच समुद्रात जोरदार वारे सुरु झाले. समुद्रात नौकांची मासे पकडण्याची जाळी वाऱ्यांमुळे गुरफटून तुटू लागली. आधीच मासे कमी प्रमाणात मिळत असताना नादुरुस्त होणाऱ्या जाळ्यांचा खर्च अंगावर पडू लागला. त्यामुळे अर्ध्यावर मासेमारी सोडून नौका पुन्हा बंदरात परतण्याचे प्रमाण वाढले. नौकांचे इंधन, नौकेवरील खलाशी व इतर कामागारांचे रेशन, बर्फ असा विविध खर्च करूनही तो वसूल होण्याइतकीही मासळी मिळत नाही, अशी अवस्था आहे. जी काही मासळी मिळत आहे ती महाग दराने विकावी लागत आहे. हे दर परवडत नसल्याने प्रमुख मच्छीमार्केटमध्ये ग्राहकांचा शुकशुकाट होता.

## एसटी गाड्या वाढवण्याची मागणी

**। उरण । प्रतिनिधी ।**



महाराष्ट्र शासनाच्या परिवहन महामंडळच्या उरण डेपोने गाड्यांच्या संख्येत वाढ करावी व सातत्याने होणाऱ्या एसटीच्या फेऱ्या रद्द करू नये यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे शहरचिटणीस शेखर पाटील यांनी डेपो मॅनेजर अमोल दराडे यांना निवेदन सादर केले. पाटील यांनी प्रवाशांच्या सेवेसाठी विविध मागण्या केल्या आहेत. त्यात डेपोमध्ये यात्रा सहल आदी कारणास्तव सकाळच्या सत्राच्या साडेसहा वाजताची पेण दादर पनवेल व इतर गाड्या रद्द करण्यात येतात तर कधी कंडक्टर ड्रायव्हर येत नसल्याने गाड्या रद्द होणे तर ड्रायव्हर कंडक्टर उशिरा येत असल्याने गाड्या उशिरा सुटणे यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत. त्यामुळे कामगार वर्गाला वेळेवर पोहोचता येत नाही यासंदर्भात प्रवाशांनी तक्रारी देऊन देखील दखल घेतली जात नाही त्यामुळे प्रवासी वर्गाला त्रास सहन करावा लागतो त्यामुळे एसटीचा प्रवासी वर्ग कमी होऊन उत्पन्नात घट होत आहे. पनवेल पेण दादर मार्गावर फेऱ्यांची संख्या वाढवण्याची गरज आहे. मात्र, गाड्यांची संख्या अपुरी आहे. त्यासाठी उरण डेपोने ज्यादा गाड्या मागवण्याची गरज आहे. यासंदर्भात उपाययोजना कराव्यात अशी मागणी शेकापक्षाचे उरण शहर चिटणीस शेखर पाटील यांनी डेपो मॅनेजर अमोल दराडे यांना केल्या आहेत. यावेळी विधानसभा अध्यक्ष नयना पाटील, नारायण पाटील उपस्थित होते.

## नुकसान भरपाईपासून शेतकरी वंचित

**। ठाणे । प्रतिनिधी ।**



ठाणे जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी राबविण्यात आलेल्या आंबियाबहार फळपीक विमा योजना २०२४/२५ अंतर्गत विमा उतरवूनही अनेक शेतकऱ्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नसल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. विशेषतः शहापूर व मुरबाड तालुक्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून ते नाराजी व्यक्त करतांना दिसत आहेत. या संदर्भात कुणबी समाजोन्नती संघाचे अध्यक्ष किशोर कुडव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे.

आंबियाबहार फळपीक विमा योजनेअंतर्गत ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा विमा पुणे यांच्या माध्यमातून उतरविण्यात आला होता. शेतकऱ्यांनी शासनाच्या निर्देशानुसार आवश्यक विमा हप्ता वेळेत भरला असूनही आजतागायत नुकसान भरपाई न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. मागील वर्षी जिल्ह्यात अचानक आलेली वादळे, अवकाळी पाऊस तसेच अपेक्षेपेक्षा लवकर सुरू झालेला पावसाळा यामुळे आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. फुलधारणा व फळधारणा टप्प्यावरच पीक नष्ट झाल्याने शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले असून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यातील काही इतर जिल्ह्यांमध्ये याच विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वितरित करण्यात आली आहे. मात्र, ठाणे जिल्ह्यातील शहापूर व मुरबाड तालुक्यांतील शेतकऱ्यांना क्लेम न मिळाल्याने भेदभाव होत असल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. दरम्यान, या संदर्भात शेतकऱ्यांनी जिल्हा क्षेत्रीय अधिकारी तसेच जिल्हा समन्वय अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता, ठोस माहिती मिळत नसल्याचे शेतकऱ्यांनी कुणबी समजोन्नती संघाच्या निर्दर्शनास आणून दिले आहे. क्लेमची सद्यस्थिती, मंजुरी प्रक्रियेबाबत स्पष्टता नसल्याने संभ्रम कायम आहे.

## गाड्यांची चोरी

**पनवेल:** कळंबोली सर्कलकडुन टी पॉईंट जंक्शन पनवेलच्या दिशेन जाणाऱ्या रोडवर, टी पॉईंट जंक्शनच्या पाठिमागे उभी करून ठेवलेली मोटार सायकलची चोरी झाल्याची घटना घडली आहे. कळंबोली सर्कलकडुन टी पॉईंट जंक्शन पनवेलच्या दिशेन जाणाऱ्या रोडवर, टी पॉईंट जंक्शनच्या पाठिमागे अंदाजे ३०० मिटर अंतरावर उभी करून ठेवलेली अंजली अशोक लेंगरे यांची हिरो कंपनीची कंपनीची प्लेंडर मोटार सायकल, काळया-निळया रंगाची, चोरी झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## स्थानकात गर्दीचा फायदा घेत चोऱ्या

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाणे रेल्वे स्थानकात लोकलमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी मोबाईल चोरीचे सत्र सुरू केले आहेत. अवघ्या दोन दिवसांत प्रथम वर्ग डब्यांतून तीन प्रवाशांचे एकूण दीड लाख रुपयांहून अधिक किमतीचे मोबाईल चोरीला गेल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. या तिन्ही प्रकरणांमध्ये ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविले असून तपास सुरू आहे. पहिली घटना २७ जानेवारीला घडली. शहाड (पूर्व), कल्याण येथील रहिवासी व ठाणे येथील शुभम सिंह हे कामावरून घरी येत असताना टिटवाळा लोकलच्या प्रथम वर्ग डब्यात चढले. याचवेळी गर्दीचा फायदा घेत चोरट्याने खिशातील २५ हजार रुपये किमतीचा मोबाईल लंपास केला. दुसरी घटना २८ जानेवारीला सायंकाळी ६.२२ वाजता घडली. उल्हासनगर येथील रहिवासी दीपेश रंगवाणी (वय २३) हे ठाणे रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक पाचवरून अंबरनाथ प्रथम वर्ग डब्यात चढताना त्यांच्या खिशातून ६२ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरीला गेला. तिसरी घटना याच दिवशी सायंकाळी ६.२५ वाजता घडली आहे.

## जांब्रुक येथील हरिनाम सप्ताहाची सांगता

**। रसायनी । प्रतिनिधी ।**



खालापूर तालुक्यातील वावंढळ या कोयना प्रकल्पग्रस्तग्रस्त गावात ५७ वा अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. सातारा जिल्ह्यातील कोयना जांब्रुक गाव कोयना धरणामुळे विस्थापित होऊन या गावची वसाहत खालापूर तालुक्यातील वावंढळ येथे या गावचे जयसिंगराव कदम यांनी वसवली आहे. मूळ गावात सुरू असलेली सप्ताहाची सुरुवात नवीन गावात देखील आपली संस्कृती, परंपरा कायम ठेवून अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा जोपासली जात आहे. राज्यातील नामवंत प्रवचनकार, कीर्तनकार यांची सात दिवस सेवा झाली. सात दिवस ज्ञानेश्वरी पारायण करण्यात आले. दररोज काकडा आरती, हरिपाठ आणि जागर भजन नित्य नियमाने करण्यात आले. तर ज्ञानेश्वरी १८ वा अध्याय वाचण्यासाठी अनेक भाविक उपस्थित होते, महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रामदास पाटील यांच्या सह बाल कीर्तनकार कार्तिकी माळी यांचे सह अनेकांची किर्तन सेवा झाली. यावेळी देवस्थान ट्रस्ट, ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व तरुण मंडळानी विशेष मेहनत घेऊन अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता यशस्वी केली.

**महिला वर्गात भीतीचे वातावरण | वाहतूक नियंत्रक कक्षाचे दरवाजेही बंद**

# एसटी स्थानकात एकच ट्यूब लाईट

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**



रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती एसटी बस स्थानक असलेल्या नागोठणे एस टी स्थानकातील बैठक व्यवस्था असलेल्या ठिकाणी रात्री एकच ट्यूब लाईट सुरू असल्याचे शनिवारी (दि.३१) रात्री ८.४५ वाजण्याच्या सुमारास मेढा येथे जाण्यासाठी नागोठणे स्थानकात गेलेल्या काही महिला प्रवाशांनी निदर्शनास आणून दिले.

नागोठणे एसटी स्थानकात रात्री एकाच ट्यूब लाईट असल्यामुळे स्थानकातील बैठक व्यवस्था असलेल्या ठिकाणी अंधार होत आहे. त्यामुळे महिला प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण असून नागोठणे एसटी स्थानकातील सर्व ट्यूब लाईट रात्री सुरू ठेवाव्यात अशी मागणी प्रवाशांतून होत आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या रोहा आगारांतर्गत असलेल्या नागोठणे एसटी बस स्थानकात रात्री १० वाजेपर्यंत एसटी गाड्यांची ये-जा सुरू असते. अशाचप्रकारे रोहाकडे जाण्यासाठी असलेल्या एका गाडीतून मेढा येथे जाण्यासाठी दोन महिला शनिवारी रात्री ८.४५ वाजण्याच्या सुमारास नागोठणे स्थानकात आल्या होत्या.

> यापुढे नागोठणे बसस्थानकात असा प्रकार घडणार नाही याची काळजी घेण्यात येईल.
> – नागोठणे वाहतूक नियंत्रक

मात्र, एसटी बस येण्यासाठी वेळ लागणार असल्याने त्यांना स्थानकातील थांबावे लागणार होते. मात्र त्यावेळी स्थानकातील आवारातील लाईट सुरू असल्या तरी बैठक व्यवस्था असलेल्या ठिकाणी असलेल्या चार ट्यूब लाईट पैकी केवळ एकच ट्यूब लाईट सुरू असल्याने तेथे अंधार होता तसेच वाहतूक नियंत्रक कक्षाचे दरवाजेही बंद असल्याचे महिलांनी सांगितले.

त्यामुळे किमान नागोठणे स्थानकातून रात्री इतरत्र जाणाऱ्या सर्व गाड्या गेल्याशिवाय वाहतूक नियंत्रक कक्ष सुरू ठेवावे तसेच बैठक व्यवस्थेतील सर्व ट्यूब लाईट सुरू ठेवाव्यात अशी मागणी प्रवाशांतून विशेषकरून महिला प्रवासी वर्गातून होत आहे.

## गनिमी काव्याचा उंबरखिंडीत जागर

**खालापूर :** तालुक्यातील चावणी ग्रामपंचायत हद्दीतील ऐतिहासिक समरभूमी उंबरखिंड येथे २ फेब्रुवारी रोजी ३६५ वा विजयदिन सोहळा मोठ्या दिमाखात साजरा होणार आहे. ग्रामपंचायत चावणी, ग्रामस्थ, जि.प रायगड, पंचायत समिती खालापूर व शिवदुर्ग मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. २ फेब्रुवारी १६६१ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली गनिमी युद्धतंत्राचा प्रभावी वापर करत मोजक्या मावळ्यांनी करतालब खानाच्या मुघल सैन्याचा दारुण पराभव केला होता. धनुष्यबाणाचा वापर हे या ऐतिहासिक लढाईचे वैशिष्ट्य होते.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ फेब्रुवारी

१) श्रीम. शारदा गिरधर पाटील
पोयनाड, अलिबाग
०२-०२-१९४२

२) श्री. गजानन महादेव कुंडे
मेघा टॉकीजसमोर, चेंढरे, अलिबाग
०२-०२-१९५६

३) श्री. सुभाष रघुनाथ कर्वे
चेंढरे, अलिबाग,
०२-०२-१९४६

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

स्व. वामन दामोदर पाटील स्मरणार्थ विद्यानगर अलिबाग



आर्या संजीव शेटकर वाढदिवस अलिबाग

## श्री रामदास नवमी उत्सवाचे आयोजन

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन येथील श्री मारूती मंदिरात २ ते ११ फेब्रुवारी या कालावधीत श्री रामदास नवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. ब्राह्मण सभा, श्रीवर्धन पुरस्कृत सालाबादप्रमाणे श्री रामदास नवमी उत्सव साजरा करण्यात येत असून एकशे पन्नास वर्षाची परंपरा आहे. या दिवसात धर्म ध्वजवंदन, पारंपरिक भजने, दासबोध वाचन व जप, मनाचे श्लोक व मारुती स्तोत्र, महिलांचे भजन व जप, श्री गजानन महाराज प्रकट दिन आणि महाप्रसाद असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास परिसरातील भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली आहे.

# निवडक



## संत रोहिदास जयंती उत्साहात साजरी

**श्रीवर्धन :** रानवली येथे संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती मोठ्या भक्तीभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. याप्रसंगी ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना मान्यवरांनी संत रोहिदास महाराजांच्या विचारांची महती सांगितली. समाजात समता, बंधुता व मानवतेची शिकवण देणाऱ्या त्यांच्या कार्याचा आदर्श आजही प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमास रानवली सरपंच सुरेश मांडवकर, समाजसेवक राजू जाधव, प्रमोद पवार, अभय चव्हाण, राजमुद्रा ग्रुप सदस्य केतन अडखले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन हरिजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. उपस्थितांनी संत रोहिदास महाराजांच्या विचारांनुसार समाजसेवेचा संकल्प केला.

## अजित पवार यांना आदरांजली

**पनवेल :** पनवेल महानगरपालिकेच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महापालिका मुख्यालयात आयोजित या कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मंगला माळवे, रवीकिरण घोडके, स्वरूप खारगे, नानासाहेब कामठे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, संजय कटेकर, मुख्य लेखा परीक्षक नीलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी गणेश शेटे यांनी अजित पवार यांचे अभ्यासू व्यक्तिमत्त्व, स्पष्ट वक्तृत्व, शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांबाबतची जाण आणि प्रशासकीय शिस्त यांचा विशेष उल्लेख केला. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात व अर्थसंकल्पीय मांडणीत त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे सांगत त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## कापडी पिशव्या वापरण्याचे आवाहन

**नवी मुंबई :** एकल वापर प्लॅस्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने कडक भूमिका घेतली आहे. केंद्र सरकार व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनांनुसार २२ ते २८ जानेवारी दरम्यान शहरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत अवघ्या चार दिवसांत ६५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून, १८ किलो प्लॅस्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या आहेत. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार सर्व विभाग कार्यालय क्षेत्रात ही कारवाई करण्यात आली.



अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व संबंधित उपआयुक्तांच्या नियंत्रणाखाली बेलापूर, नेरूळ, वाशी, तुर्भे, कोपरखैरणे व घणसोली विभागांत दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. नियमभंग करणाऱ्या व्यावसायिकांकडून प्लॅस्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. दरम्यान, नागरिकांनी पर्यावरण रक्षणासाठी एकल वापर प्लॅस्टिक टाळून कापडी पिशव्यांचा वापर करावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## सुसज्ज बस स्थानके उभारण्याची मागणी

**नवी मुंबई :** नवी मुंबईसारख्या स्मार्ट शहरात सर्व सोयीसुविधा उपलब्ध असून, मागील काही वर्षांत टप्प्याटप्प्याने बस स्थानकेदेखील अत्याधुनिक करण्यात आली आहेत. मात्र, बेलापूर सेक्टर १, २ येथील काही बस स्थानके आजही जुन्या, जीर्ण अवस्थेत असून, असुविधांमुळे नागरिकांना रस्त्यावर उभे राहत बस पकडावी लागत आहे. बेलापूर येथील नागरिकांना बस सुविधा सलग असल्याने नागरिकांचा मोठा कल बस प्रवासाकडे असतो. मात्र, बेलापूर परिसराअंतर्गत धावणाऱ्या बस



नियमित अधिक संख्येने असल्या तरी, प्रवासा दरम्यान जुन्या, जीर्ण, मोडकळीस आलेली आसने यांमुळे बस स्थानके असुविधांची ठरत आहेत. दरम्यान, इतरत्र डिजिटल पद्धतीची आलिशान बस स्थानके असताना बेलापूर परिसरातील काही बस स्थानके मात्र असुविधांचे माहेरघर ठरत आहेत. परिणामी, बेलापूर येथील सेक्टर १,२ परिसरातील जुनी बस स्थानके काढून नवी अत्याधुनिक बस स्थानके उभारण्याची मागणी नागरिक करत आहेत.

## प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**तुर्भे :** सरसोळे बस स्थानक परिसरात खासगी वाहनांची मोठ्या प्रमाणावर अनधिकृत पार्किंग सुरू असून, एन.एम.एम.टी. प्रशासनाच्या हलगर्जीमुळे प्रवाशांची गैरसोय व सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. सिडकोकडून उपलब्ध झालेल्या या बस स्थानकात पूर्वी नियंत्रक चौकी व पास सुविधा केंद्र कार्यरत होते. मात्र बसेसची संख्या कमी झाल्यानंतर नियंत्रक हटविण्यात आल्याने या स्थानकात नियंत्रणाचा अभाव निर्माण झाला आहे.सध्या बस स्थानकातील मोकळ्या जागेत तसेच थेट बस थांब्याच्या समोर मालवाहतूक वाहने, खासगी व वाणिज्य वाहने, गॅस सिलिंडरच्या गाड्या पार्क केल्या जात आहेत. यामुळे बसच्या ये-जा करताना अडथळा निर्माण होत आहे. चालकांनी वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कारवाई झालेली नाही. तसेच काही वाहनांमध्ये गर्दुल्ले व मद्यपी आढळून येत असल्याने रात्रीच्या वेळी प्रवासी, विशेषतः महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत असून, तातडीने कारवाईची मागणी होत आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे दादांना श्रद्धांजली

उरण : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांचे नुकतेच एका विमान दुर्घटनेत दुर्दैवी मृत्यू झाला. उरण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली. या श्रद्धांजली कार्यक्रम प्रसंगी परीक्षित ठाकूर, मनोज भगत, ॲड. रजनीकांत पाटील, विद्याधर घरत, रमण कासकर, वैजनाथ ठाकूर, रतन म्हात्रे, निलेश पाटील, भूषण ठाकूर, नरेश घरत, अखिलेश भोईर, मच्छिंद्र ठाकूर, नामदेव मढवी आदी मान्यवर उपस्थित होते.

# ३४ बांधकामांना स्थगिती

■ वायू व ध्वनी प्रदूषणाबाबत नियमांचे उल्लंघन

■ पनवेल महानगरपालिकेची कारवाई

। पनवेल । वार्ताहर ।

उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार तसेच पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिका हद्दीतील बांधकाम प्रकल्पांवर वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण व पर्यावरणीय नियमांच्या उल्लंघनाबाबत व्यापक तपासणी करून कारवाई करण्यात आली.

स्थळ पाहणी अहवालानुसार एकूण ३४ बांधकामस्थळांवर कठोर कारवाई करण्यात आली असून सदर प्रकल्पांचे काम तात्काळ थांबविण्यात आले आहे.

यापूर्वी महापालिकेच्या वतीने एकूण १६९ बांधकाम प्रकल्पांना, स्थळांना उपाययोजना करणेबाबत अथवा काम बंद करणेबाबाबत इशारावजा जाहीर नोटीस देण्यात आलेली होती.

संबंधित बांधकाम व्यावसायिकांना नोटीसा बजावण्यात आल्यानंतरही काही व्यवसायिकांनी अपेक्षित कार्यवाही न केल्याचे दिसून आले. त्यानंतर महानगरपालिकेच्या पथकाने पुन्हा एकदा प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी केली.

तपासणीदरम्यान अनेक ठिकाणी धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना न करणे, बांधकाम साहित्य खुले ठेवणे, बांधकामाच्या ठिकाणी प्रदूषण करणाऱ्या साहित्यावर नियमाप्रमाने पाणी न शिंपडणे, वाहन स्वच्छता न करणे, तसेच ब्लास्टिंग करतानाच्या मानक कार्यपद्धतीचे पालन न करणे आदी गंभीर बाबी निदर्शनास आल्या. सदर कारवाई दरम्यान संबंधितांना तात्काळ सुधारात्मक उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन सुरूच राहिल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

नागरिकांचे आरोग्य, स्वच्छ हवा व पर्यावरण संरक्षण याबाबत पनवेल महानगरपालिका कटिबद्ध असून, यापुढेही अशा प्रकारच्या तपासण्या व कारवाई नियमितपणे सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**विभागनिहाय कारवाई**
कळंबोली विभाग – १० बांधकाम प्रकल्प
कामोठे विभाग – ०९ बांधकाम प्रकल्प
नवीन पनवेल, पनवेल विभाग – १५ बांधकाम प्रकल्प
एकूण : ३४ बांधकाम प्रकल्पांवर कारवाई



# कारागृहात बंद्यांकरीता विशेष स्पर्धा संपन्न

। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रजासत्ताक दिनी देशभरात वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात त्या अनुषंगाने कारागृहातील दाखल बंद्यांना स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाची तसेच प्रजासत्ताक दिनाची जाणीव व्हावी तसेच कारागृहातील बंदी सुध्दा या देशाचे नागरिक आहेत. त्यांना देशाविषयी आपुलकी वाटावी व स्वत:चा आत्मविश्वास वाढावा याकरीता कारागृहातील बंद्यांकरीता देशभक्तीपर गाणे, रांगोळी, मेहंदी, चित्रकला स्पर्धा, बुध्दीबळ स्पर्धा, कॅरम स्पर्धा व देशभक्तीपर निबंधस्पर्धा, विविध विशेष स्पर्धा संपन्न झाल्या.

या विविध स्पर्धामध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या बंद्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस शिक्षणाधिकारी ललिता दहितुले तसेच शिक्षणाधिकारी, महारुद्रा नाले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना बंद्यांचे भावी जीवनात शिक्षणाचे महत्व सोप्या भाषेत समजावून सांगितले तसेच बंद्यांना कारागृहात दाखल असताना तसेच कारागृहातून सुटून बाहेर पडल्यावर पुढील शिक्षण कसे प्राप्त करता येईल याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी प्रथम कारागृहातील सर्व बंद्यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. त्यानंतर बंदी कारागृहात दाखल असताना जिल्हा उद्योग केंद्र व जिल्हा कौशल्य विभाग यांच्यामार्फत घेतल्या जाणाऱ्या प्रशिक्षणात सहभागी होवून प्रशिक्षण घेण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच या प्रशिक्षणाच्या माध्यमातून बंद्यांनी या प्रशिक्षणांत सहभाग घेतल्यास बंदी आत्मनिर्भर होवून त्यांना रोजगार उपलब्ध होईल तसेच स्वत:ची व कुटुंबाची जबाबदारी योग्यरित्या सांभाळून त्यांचा उदर निर्वाह करु शकतात, असे सांगितले.

# निवडक



## निरोप समारंभ उत्साहात संपन्न

**खांब :** शरण्या अकॅडमी, कोलाड यांच्या वतीने दि.२४ रोजी विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ निरोप समारंभ उत्साहात पार पडला. या समारंभात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीचा गौरव करण्यात आला तसेच त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षिका सुप्रिया वरखले, बाबासाहेब आंबेडकर टूक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी प्रा.तेजस महागावकर, शरण्या अकॅडमी संचालिका ऋतुजा महागावकर,कोलाड सरपंच रवींद्र सागवेकर, सामाजिक कार्यकर्ते यशवंत निकम, विलास निकम, लालासाहेब शिंदे,पं.स.रोहा बाल विकास प्रकल्प अधिकारी,शरयू सागर शिंदे, संतोष काकडकर व नामदेव देवकर आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबत मूल्याधिष्ठित जीवनाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनीही आपल्या भावना व्यक्त करत शिक्षक व संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संपूर्ण कार्यक्रम आनंदी वातावरणात पार पडला.शरण्या अकॅडमीच्या या उपक्रमाबद्दल उपस्थितांनी प्रशंसा व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

## विजयी नगरसेवकांचा भव्य सत्कार

**पनवेल :** कळंबोली येथील नवीन सुधागड हायस्कूलच्या सभागृहात अनंत गीते यांच्या हस्ते कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी नवनिर्वाचित शिवसेना नगरसेवक प्रगती कैलास पाटील, लीना अर्जुन गरड, उत्तम मोर्बेकर, प्रिया गोवारी, प्रतीक्षा गोवारी, मेघना घाडगे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच लढवय्या उमेदवारांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास शिवसेना उपनेते बबन पाटील, शिवसेना उपनेते बाळ माने, अवदूत शुक्ला, सहसंपर्कप्रमुख अनिल चव्हाण, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील व उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, तालुकाप्रमुख संदीप तांडेल, महानगर प्रमुख अवचित राऊत, प्रदीप ठाकूर, ग्राहक कक्षाचे अध्यक्ष शशिकांत डोंगरे, तालुका संपर्कप्रमुख रामदास पाटील, शहरप्रमुख रामदास गोवारी, हेमंत म्हात्रे, प्रदीप केणी, सूर्यकांत मस्कर, विभागप्रमुख महेश गुरव, संतोष म्हात्रे, सर्व उपविभागप्रमुख, शाखाप्रमुख व कार्यकर्ते, युवासेनेचे नितीन पाटील व अजय पाटील, महिला संघटिका संगीता राऊत, सुनंदा पाटील आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन शिवसेना उपनेते बबन पाटील यांनी केले होते.

## भाताण येथे डिझेलची चोरी

**पनवेल :** ट्रकमधील दीडशे लिटरची डिझेलची चोरी केल्याप्रकरणी तीन अनोळखी ईसमा विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद अली यांनी मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवरील भाताण, एमिटी युनिव्हर्सिटी येथील ट्रक पार्किंगमध्ये कंटेनर ट्रक पार्क करून ते विश्रांती करत होते. पहाटे सहाच्या सुमारास तीन अनोळखी व्यक्ती ट्रकमधील डिझेल चोरी करून पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर कार मध्ये ठेवत असताना दिसून आले. त्यांना हटकले असता यावेळी ते तिघे कारमधून पळून गेले.

## खारघर येथे पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत रस्ता क्रॉस करणाऱ्या पादचाऱ्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पन्नास वर्षीय इसम खारघर येथील मुंबई पुणे लेनवर हिरानंदानी ब्रिजच्या पुढे रस्ता क्रॉस करत होता. यावेळी अज्ञात वाहन चालकाने चार चाकी वाहन भरधाव वेगाने चालवून त्याला धडक दिली. या धडकेत त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर कारचालक पळून गेला.

## स्वाभिमानी युथ रिपब्लिकनची बैठक

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तालुका अध्यक्ष यांची बैठक माणगाव येथे माणगाव तालुका अध्यक्ष नितेश हाटे यांच्या कार्यालयात घेतली. त्यावेळी पनवेल तालुका अध्यक्ष दिलीप नाईक, श्रीवर्धन तालुका अध्यक्ष सुयोग लोखंडे, महाड तालुका अध्यक्ष सुजित जाधव, महाड शहराध्यक्ष इत्यादी प्रमुख पदाधिकारी होते. या कार्यक्रमांमध्ये रोहा तालुका अध्यक्षपदी संतोष कवितकर यांची निवड करण्यात आली. या बैठकीमध्ये येत्या २० मार्च रोजी क्रांती दिन संपन्न करण्यात येणार आहे त्याच्या पूर्वतयारी विषय सुद्धा चर्चा करण्यात आली. या बैठकीमध्ये रायगड जिल्हा संघटक राजेश हाटे, रायगड जिल्हा उपाध्यक्ष रमेश मोरे पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. संघटनेची पाळेमुळे तळागळात रोवण्यासाठी झालेल्या बैठकीत निर्धार करण्यात आला. वंचित आणि दुर्बल घटकांच्या मदतीसाठी प्रयत्न करून संघटना बळकट करण्याच्या मुद्द्यावर बैठकीत महत्वाच्या चर्चा करण्यात आल्या.

# साहित्यसंपदातर्फे विश्वविक्रमी कथा वाचन महोत्सव यशस्वी

। नागोठणे । प्रतिनिधी ।

विश्वविक्रमी ऑनलाईन काव्यवाचन सोहळ्याच्या यशस्वी आयोजनानंतर मराठी भाषा पंधरवड्याचे औचित्य साधून साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे यांच्या संकल्पनेतून साहित्यसंपदा आयोजित मगोष्टी तुमच्या आमच्याफ ऑनलाईन कथावाचन महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

फेसबुक लाईव्हने पार पडलेल्या या कथा वाचन सोहळ्यात महाराष्ट्रातीलच नव्हे तर बेंगलोर, कतार, सिंगापूर, अमेरिका येथील विविध भागांतून, स्तरांतून कथाकारांनी यशस्वी सहभाग नोंदविला. या कथावाचन सोहळ्यात अनेक नामवंत कथाकार आणि महाराष्ट्रातील विविध ७ शाळा सहभागी झाल्या होत्या. ऑनलाईन सांगता समारंभास जेष्ठ साहित्यिक आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष राजन लाखे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना वाचन चळवळीचे महत्व उदाहरणासहित उलगडून दाखविले.

व्हॉइस थेरपिस्ट डॉ.सोनाली लोहार यांनी शाळेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना वाचन संस्कृतीची बीजे मुलांच्या मनात रुजविणे गरजेचे आहे अशी भावना व्यक्त केली. मराठी भाषा पंधरवड्याची सांगता सोहळ्याने झाल्याने साहित्य वर्तुळात आनंदाचे वातावरण पाहण्यास मिळाले.

# देशी दारुचा साठा हस्तगत

**पनवेल :** पळस्पे गाव येथे पनवेल शहर पोलीस ठाणे व सहाय्यक पोलीस आयुक्त युनिट ३ च्या पथकाने केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये मोठ्या प्रमाणात देशी दारुचा साठा हस्तगत केला असून याप्रकरणी एका महिलेविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. पळस्पे गाव परिसरात एक महिला बेकायदेशीररित्या देशी दारुचा साठा करून त्याची विक्री करत असल्याची माहिती पनवेल शहर पोलीस व सहायक पोलीस आयुक्त युनिट ३ ला मिळताच त्यांच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून जवळपास ४ हजार ८०० रुपयाचा देशी दारुचा साठा हस्तगत केला आहे.

# मुरुड समुद्रकिनारी आगळीवेगळी फिशिंग स्पर्धा

। मुरुड–जंजिरा । प्रतिनिधी ।

नवीमुंबई येथील न्यू अंगलर मुंबई संस्थेने मुरुड एकदरा जवळील गायमुख समुद्रकिनारी १०० हुन अधिक स्पर्धकांची ६ वि फिशिंग स्पर्धा आयोजित केली.

या स्पर्धेत सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत समुद्रावर ठरवून दिलेल्या जागेवर फिशिंग रोडने मासेमारी करायची होती. ज्याला सर्वात मोठा व जास्त वजनाचा मासा मिळेल तो प्रथम येणार त्याला ५० हजार, २५हजार आणि १५ हजारांची रोख पारितोषिके देण्यात आली. संस्थेच्या अटी व नियम लागू असणार अशी माहिती प्रमुख अविनाश मुकादम, यांनी दिली. कल्पेश धुमाळ, नदीम शेख, प्रशांत रानकर, अक्षय दांडेकर, गणेश कोळी, अजय म्हात्रे, हर्षद मळेकर, संकेत पाटील, गणेश पाटील यांनी स्पर्धा घेतली. अविनाश मुकादम म्हणाले, एकदरा गावामागे असणारा गायमुख परिसर फिशिंगसाठी शांत आहे. समुद्राच्या लाटांसोबत येणारा वारा अनुभवत फिशिंग करण्याचा आनंद काही वेगळाच असतो, अनेकांना फिशिंगची आवड असते परंतु चांगले लोकेशन व सर्व सुविधा उपलब्ध नसतात. ॲडव्हेंचर विभागात या स्पर्धेचा समाविष्ट होतो. मासेमारी करताना स्पर्धकाला सहनशील व एकग्रहता गरजेची असते, असे ते म्हणाले.



■ १०० स्पर्धकांनी फिशिंगरोडने केली मासेमारी

# उरण महाविद्यालयात रक्तदान शिबिराला प्रतिसाद

। उरण । प्रतिनिधी ।

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, लायन्स क्लब उरण, लिओ क्लब उरण, टायगर ग्रुप, राजे शिवाजी मित्र मंडळ उरण यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात भारताच्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन केले गेले.



यावेळी महात्मा गांधी मिशन कामोठे नवी मुंबईच्या ब्लड बँकेचे सहाय्य घेण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही व्ही गर्जे, एम जे एफ ला.मा. सदानंद गायकवाड, लायन्स क्लबचे अध्यक्ष रावसाहेब ओहो, उपाध्यक्ष ला. संदीप सदानंद गायकवाड, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विशाल पाटेकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये दुसऱ्यांदा रक्तदान शिबीर आयोजित केले गेले, या रक्तदान शिबिरात एकूण ६० रक्तदात्यांनी रक्तदान केले. डॉ. शुभम शिंगारे, डॉ. नम्रता भोईर, डॉ. प्राची घरत, डॉ. निकिता चोरट आदींनी सहकार्य केले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सदस्यांनी रक्तदान शिबिराच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.

# सुक्या मेव्याची झाली चोरी

**पनवेल :** चोराने दुकानात प्रवेश करून काजू, बदाम, वेलची, रोख रक्कम असा १६ हजार २०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी कळंबोली पोलीस अधिक तपास करत आहेत. सुशील जयस्वाल हे उलवे येथे राहत असून त्यांचा कळंबोली, सेक्टर ११ येथे गोयल ट्रेंडिंग शॉप आहे. ते दुकानावर आले असता लोखंडी कुलूप कापलेले दिसून आले. आत मध्ये जाऊन पाहणी केली असता काजू, बदाम, वेलची आणि रोख रक्कम दिसून आली नाहीत.

# अंबिका स्टील सर्व्हिस सेंटरला लागली आग

। पनवेल । प्रतिनिधी ।

तळोजा फेज १ येथील एका दुकानाला आज सकाळी लागलेल्या आगीत तीन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

तळोजा फेज १ मधील अंबिका स्टील सर्व्हिस सेंटर या गृहवस्तू भांडाराच्या दुकानात सिलेंडरचा स्फोट होवून लागलेल्या आगीत या दुकानात असणारी एक महिला व दोन मुले जखमी झाले असून त्यांना नजिकच्या रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहेत. या घटनेची माहिती मिळताच अग्नीशमन दलाचे पथक घटनास्थळी येवून त्यांनी आग आटोक्यात आणली. या आगीमध्ये दुकानाचे मोठे नुकसान झाले आहे.



# बबन कोलाटकर यांना देवाज्ञा

**खांब :** रोहा तालुक्यातील श्री.क्षेत्र तळवली गावचे रहिवासी असणारे बबन पांडुरंग कोलाटकर यांना बुधवारी (दि.२८) वयाच्या ८० व्या वर्षी देवाज्ञा झाली.



बबन महाराज कोलाटकर हे वारकरी संप्रदायाचे निस्सीम भक्त होते. आपल्या कामधंद्याच्या निमित्ताने ते मुंबई येथील भाईंदर येथे स्थायिक झाले होते. त्यांच्या पश्चात भाऊ, तीन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी व अंतिम धार्मिकविधी शुक्रवारी (दि.६) भाईंदर येथील निवासस्थानी होणार असल्याची माहिती निकटवर्तीयांनी दिली.

# पळस्पे पोलिसांचे जाणीवजागृती अभियान

। पनवेल । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०२६च्या अनुषंगाने नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या वतीने पळस्पे फाटा येथे हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकी चालकांसाठी जनजागृतीपर आणि माणुसकीचा संदेश देणारा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. झालेल्या या उपक्रमात दंडात्मक कारवाईपेक्षा जनजागृतीवर भर देण्यात आला.



पोलीस उपायुक्त (वाहतूक) तिरुपती काकडे तसेच सहायक पोलीस आयुक्त विजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी हेल्मेट न परिधान करता दुचाकी चालविणाऱ्या ५० मोटरसायकल चालकांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले. तसेच प्रत्येक चालकाला गुलाबपुष्प व हेल्मेट देत, यापुढे प्रत्येक वेळी मोटरसायकल चालविताना हेल्मेट वापरण्याबाबत स्नेहपूर्वक प्रबोधन करण्यात आले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- We are inviting for internship to graduate candidates for share market trading.Stipend will be paid. For interview call 9923750549
- पाहिजेत : अलिबाग विभागासाठी सेल्समध्ये जॉब्स करण्यासाठी सुवर्णसंधी. फिक्स सॅलरी १५०००, २००००, २५००० + सुपर इन्सेंटीव्ह E Disha infotech या शैक्षणिक संस्थेत तातडीने पाहिजेत. Educational counselors/sales Executive-10 franchise-10 telecaller-2 Contact- 9082697644, 9372071769
- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण– बामणसुरे, चोंढी, पगार– १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१
- अलिबागपासून चार ते सात किमी अंतरावर १० ते २० गुंठे बागायत शेती व अलिबाग एसटी स्टँडजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

रॅलीत विद्यार्थ्यांसह नागरिकांचा सहभाग | मूक रॅलीतून गुंजला पीडितांचा आवाज

# मानव तस्करीविरोधात पनवेलमध्ये वॉक फॉर फ्रीडम रॅली

। पनवेल । प्रतिनिधी ।

मानव तस्करीसारख्या गंभीर सामाजिक समस्येविरोधात जनजागृती निर्माण करण्यासाठी भागूबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ, पनवेल येथे सकाळी वॉक फॉर फ्रीडम ही मूक रॅली उत्साहात पार पडली.




या रॅलीत महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, स्वयंसेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. राष्ट्रीय पातळीवर मानव तस्करी निर्मूलनासाठी राबविण्यात येणाऱ्या चळवळीचा एक भाग म्हणून भारतातील ३० हून अधिक ठिकाणी ही रॅली एकाच वेळी आयोजित करण्यात आली होती. पनवेल येथील रॅलीत १०० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवून मानव तस्करीविरोधातील लढ्यात आपली सामाजिक बांधिलकी व्यक्त केली.

या मूक रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे अध्यक्ष आर. व्ही. येले, मुख्य कार्यक्रम अधिकारी आकाश पाटील व एनएसएस कार्यक्रम अधिकारी रुपेश माने यांच्या हस्ते करण्यात आले. रॅलीदरम्यान सहभागी विद्यार्थी हातात मानव तस्करीची भयावह वास्तवता मांडणाऱ्या घोषणा असलेले फलक घेऊन एकाच रांगेत शांततेत मार्गक्रमण करत होते.

मूक स्वरूपातील ही रॅली तस्करीच्या बळी ठरलेल्या, आवाज गमावलेल्या पीडितांप्रती एकजूट आणि संवेदनशीलतेचे प्रतीक ठरली. रॅलीची सुरुवात महाविद्यालय परिसरातून होऊन खांदा कॉलनी मंदिरापर्यंत झाली व त्यानंतर पुन्हा महाविद्यालयात समारोप झाला. रॅलीपूर्वी सहभागी विद्यार्थ्यांना मानव तस्करीची लक्षणे ओळखणे, संशयास्पद बाबी लक्षात आल्यास तत्काळ मदत कशी मिळवावी, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच १०९८ (चाइल्डलाइन), १८१ (महिला हेल्पलाईन) व १९३० (सायबर गुन्हे) या राष्ट्रीय मदत क्रमांकांची माहिती देऊन नागरिकांनी हे क्रमांक आपल्या मोबाईलमध्ये सेव्ह करण्याचे आवाहन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार, सध्या जगभरात सुमारे ४९.६ दशलक्ष लोक आधुनिक गुलामगिरीचे बळी ठरत आहेत. भारतात दररोज सरासरी ४ मुले मानव तस्करीची शिकार होत असून, दररोज १२९ मुले बेपत्ता होत असल्याची नोंद राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या अहवालात आहे. अलीकडेच महाराष्ट्रातही अशा घटना उघडकीस आल्याने या विषयाची तीव्रता अधिक ठळक झाली आहे.

# मुख्याध्यापकांनाही टीईटी उत्तीर्ण होण्याचे बंधन

## टीईटी उत्तीर्ण असल्याशिवाय आता शिक्षकांना वरिष्ठ अन् निवड वेतनश्रेणी नाही



**। रायगड । प्रतिनिधी ।**

इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांवरील शिक्षकांसाठी टीईटी बंधनकारक असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. पण, हा निर्णय शिक्षकांसाठी असून मुख्याध्यापकांसाठी नाही, असा संभ्रम होता. परंतु, मुख्याध्यापकांना देखील टीईटीची अट लागू असल्याचे माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने (एनसीटीई) शाळांवरील शिक्षकांसाठी पात्रता निश्चित केली आहे. त्यानुसार २०१० पासून टीईटीची अट घालण्यात आली. परंतु, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ज्या शिक्षकांचे वय ५३ वर्षांपर्यंत आहे, त्यांना देखील दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण व्हावी लागणार आहे.

मुदतीत पात्रता पूर्ण न केल्यास संबंधितांवर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई केली जाणार आहे. दुसरीकडे विस्ताराधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापकांच्या पदोन्नती देखील टीईटी उत्तीर्ण असेल तरच दिली जाणार आहे.शिक्षकांनाही निवड व वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी टीईटी बंधनकारक आहे.

यामुळे सद्य:स्थितीत जिल्हा परिषदेच्या सुमारे ३५ ते ४० शाळांची जबाबदारी प्रभारी मुख्याध्यापकांवर सोपविण्यात आली आहे. ज्या शिक्षकांची सेवा १२ वर्षे, २० वर्षांपेक्षा जास्त झाली आहे, त्यांना वेतनश्रेणीसाठी आता टीईटी उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. आता उन्हाळा सुट्ट्यांमध्ये या शिक्षकांना उतारवयात देखील टीईटीचा अभ्यास करावा लागणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पहिली ते आठवीच्या वर्गांवरील नियुक्त शिक्षकांना (निवृत्त होण्यास पाच वर्षे शिल्लक असलेले वगळून) दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण व्हावीच लागणार आहे. माध्यमिक शाळांवरील इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गांवर नियुक्त शिक्षक बीएडधारक असला, तरीदेखील त्यांच्यासाठी टीईटीचे बंधन आहेच.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांवरील नियुक्त शिक्षकांसाठी टीईटी उत्तीर्ण बंधनकारक आहे. सहावी ते आठवीच्या वर्गांवरील नियुक्त शिक्षक डीएड, बीएडधारक असेल, त्यांना देखील न्यायालयाने दिलेल्या दोन वर्षांच्या मुदतीत टीईटी उत्तीर्ण व्हावीच लागणार आहे. त्यानुसार राज्य शासनाने टीईटी उत्तीर्ण असलेले व नसलेले, अशी माहिती मागितली आहे असे शिक्षण विभागातील सूत्रांनी सांगितले.

## नेने महाविद्यालयाचे ‘उड्डाण’मध्ये यश

**खरोशी** : पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण येथील डी.एल.एल.ई. युनिटच्या विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठ, मुंबई तर्फे आयोजित उड्डाण फेस्टीवल या भव्य उपक्रमात उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. या फेस्टीवलमध्ये महाविद्यालयातील २१ विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला होता.

यामध्ये डॉ. देवीदास बामणे लिखित जागे व्हा विद्यार्थी, जागे व्हा या पथनाट्याचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे केले. तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जीवनगाथा या पोवाडा सादरीकरणात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन मुंबई विद्यापीठात तृतीय क्रमांक मिळविला.

या यशस्वी पोवाडा पथकात पाटील समिक्षा, पाटील प्राची, पाटील करीना, वाघ हेमा, पाटील साक्षी, पाटील पारस आणि पाटील हर्षल यांनी मेहनत घेऊन उल्लेखनीय कामगिरी केली.

# नेरळ–कळंब रस्त्याचे काँक्रिटीकरण



### निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीचा फायदा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

निवडणूक सुरू असल्याने सर्वत्र अनधिकृत कामे करण्याचे पेव फुटले आहे. त्यात सरकारी कामेदेखील जोमाने सुरू असून शंभरहून अधिक कोटी खर्च करून बांधण्यात येत असलेल्या नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावर चक्क माती खोदून त्यात सिमेंट काँक्रिटीकरण केले जात आहे. स्थानिकांनी आवाज उठवल्यावर तेथे असणारे ठेकेदार तसेच कर्मचारी यांना तक्रार करणारे काय बोलतात हे उमजत नसल्याने रस्त्याच्या कामाचा बोजाबारा वाजण्याची शक्यता आहे.

माथेरान नेरळ कळंब या रस्त्यावरील नेरळ रेल्वे फाटक ते पोही या साधारण १२ किलोमीटर भागातील काँक्रिटीकरण न झालेल्या रस्त्यात काँक्रिट केले जाणार आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या हायब्रीड तत्वावर रस्ता बनविला जात असून साधारण ११५ कोटींचा निधी या रस्त्याला मंजूर झाला आहे. या रस्त्यात आता रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुरक्षा भिंती बांधल्या जात असून ही काय करण्यासाठी तेथे खोदकाम केले जात आहे. खोदकाम करताना रस्त्याच्या आजुबाजूला असलेली झाडे तोडण्यात येत असून त्यासाठी ठेकेदारांना कोणत्याही परवानग्या घेतलेल्या नाहीत.मात्र तरीदेखील रस्त्याच्या कामाचा झपाटा सुरू आहे. त्याबाबत निवडणूक काळ लक्षात घेऊन आपली कामे पुढे रेटण्याचा प्रयत्न ठेकेदार कंपनी करीत आहे.परंतु ठेकेदार हा स्थानिक नसल्याने लोकांना तक्रारी करणे कठीण होऊन बसले आहे. ठेकेदार राज्याबाहेरील दाक्षिणात्य असल्याने त्या ठेकेदाराने आणलेले कर्मचारी यांना मराठी काय हिंदी भाषा देखील बोलता येत नाही. त्यामुळे ठेकेदाराला मनमानी करता येत असून स्थानिक ठिकाणी सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी एकदाही आलेले नाहीत असा आरोप स्थानिक करीत आहेत.

सार्वजनिक बांधकाम खात्याकडून रस्त्याचे काम सुरू असून सध्या धामोते गावापासून पुढे रस्त्याच्या बाजूला खोदकाम करून सुरक्षा भिंती बांधल्या जात आहेत.या संरक्षक भिंती बांधताना जमीन खोदली जात असून माती निघाल्यानंतर कोणत्याही प्रकारचे खडीकरण न करता थेट तेथे सिमेंट काँक्रिटीकरण केले जात असल्याचे दिसून येत आहे. त्या बाबत बिरदोले, कोदीवले गावातील ग्रामस्थांनी आवाज उठविला असता तेथे असलेल्या कर्मचारी यांना मराठी किंवा हिंदी भाषा बोलता येत नसल्याने कोणत्याही तक्रारी ठेकेदाराकडे या तक्रारी पोहचत नाहीत. त्यामुळे काम त्याच पद्धतीने पुढे सुरूच असून निवडणूक काळात येथे राजकारणी मंडळी पोहचत नसल्याने ठेकेदाराने काम पुढे रेटण्याचा प्रयत्न केला आहे.

# ‘गुणवत्तेसाठी शिक्षकांनी प्रयत्नशील रहावे’



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

प्राथमिक शिक्षणाधिकारी ललिता दहीतुल्ले या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा जिल्हास्तर मूल्यांकन करण्यासाठी दिनांक नुकत्याच म्हसळा तालुक्यातील पीएनपी हायस्कूल काळसुरी येथे आल्या होत्या. सदर ठिकाणी मेंदडी केंद्राची शिक्षण परीषद सुरू असल्याने दहितूले यांनी भेट दिली.

केंद्र प्रमुख किशोर मोहिते यांनी मान्यवरांचे स्वागत केले व केंद्रातील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सुरू असलेले उपक्रम, शिष्यवृत्ती परीक्षा सराव चाचण्या व यातून मागील वर्षी मिळालेले यश, निपूण चाचणी, भौतिक सुविधा याबाबत माहिती दिली.

शिक्षणाधिकारी दहितूले यांनी शिक्षकांजवळ संवाद साधला व मार्गदर्शन केले. केंद्रातील सुरू असलेल्या शैक्षणिक उपक्रमांबाबत समाधान व्यक्त केले. केंद्रातील शिक्षकांची प्रशंसा केली. आपण सर्वांनी मिळून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अधिक प्रयत्न करावे.पटसंख्या वाढीसाठी गावातील पालकांना छोट्या व्यवसायांची माहिती देवून शासकीय योजनांची माहिती दिली पाहिजे.

जेणेकरून स्थलांतर थांबेल व भविष्यात आपल्या शाळा टिकतील. सर्व शासकीय योजनांची अंमलबजावणी यशस्वी होईल याकडे शिक्षकांनी लक्ष दिले पाहिजे.विद्यार्थी सुरक्षा समिती व इतर सर्व समित्यांची यशस्वी अंमलबजावणी करावी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करावे असे आवाहन केले.

## सुनीता म्हात्रे यांचे निधन

**चिरनेर** : उलवे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कार्यरत असलेल्या उलवे ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या तथा सेविका महिला मंडळाच्या अध्यक्षा व समाजसेविका सुनीता म्हात्रे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर साईनगर स्मशानभूमीत रविवारी १ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मनसैनिक विकी म्हात्रे यांच्या त्या मातोश्री होत.

# श्री दिव्यांग सामाजिक संस्थेच्या वतीने हळदीकुंकू सोहळा



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

एक हात मदतीचा आणि माणुसकीचा हा वारसा जपत, श्री दिव्यांग सामाजिक संस्थेच्या वतीने मोठ्या उत्साहात ‘हळदीकुंकू’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून दिव्यांग भगिनींचा सन्मान केला.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणून चारिझेन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, पूजा रंधावा आणि उमेश यादव उपस्थित होते.

तसेच प्रशासकीय आणि पोलीस दलातील मान्यवर म्हणून पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यावेळी अंकिता मोरे, खडतर, कल्याणी पाटील, किशोर झेमसे, अंजली आणि पूजा वाघमोडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

केवळ धार्मिक विधी म्हणून नव्हे, तर दिव्यांग महिलांना मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. बोऱ्हाडे यांनी आपल्या भाषणात दिव्यांगांच्या हक्क आणि सुरक्षेबाबत मोलाचे मार्गदर्शन केले, कॅप्टन रंधावा यांनी दिव्यांग व्यक्तींच्या जिद्दीला सलाम केला.

ही संस्था केवळ कार्यक्रम आयोजित न करता वर्षभर खालील क्षेत्रांत कार्य करते. दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी बनवण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण देणे. दिव्यांगांसाठी असलेल्या विविध सरकारी योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचवणे. दिव्यांगांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच आयोजन करण्यात येते. मोफत आरोग्य तपासणी आणि सहाय्यक उपकरणांचे वाटप केले जात आहेत. समाजाने दिव्यांगांकडे सहानुभूतीने न बघता समानतेने बघावे, हाच आमच्या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

# वरसगांव–भिरा मार्गांवरील गतिरोधक अपघाताला निमंत्रण



**। धाटाव । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गवरील वरसगांव ते भिरा फाट्यावर गतिरोधक बसविण्यात आले आहेत. हे गतिरोधक वेगाची नशा अपघाताचे कारण ठरत आहेत. आठ दिवसापूर्वी या गतिरोधकामुळे एकाच दिवशी दोन दुचाकीस्वारांचा अपघात झाला होता. या अपघातात चालक जखमी झाले होते. अपघात टाळण्यासाठी अंडरपासची गरज होती,परंतु अंडरपास रस्ता नसल्याने अतिवेगाने जाणाऱ्या वाहनाने प्रवाशांचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार कोण? असा सवाल विचारला जात आहे.

महामार्गाचे काम एप्रिल २०२६ च्या आत पूर्ण होईल अशी नवीन डेडलाईन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली असून हे काम तीन महिन्यांनंतर पूर्ण ही होईल परंतु मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर वरसगांव-भिरा फाट्यावर वाहतूकीचे वेग वाढणार असून यामुळे या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण होणार आहे. यामुळे वरसगांव भिरा फाट्यावर वाहनांचा वेग कमी करण्यासाठी या ठिकाणी पर्याय म्हणून सिग्नल बसविण्यात यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

## संत शिरोमणी रोहिदास जयंती उत्साहात

**म्हसळा** : शहरातील हरिजन वाडीत संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या कार्याला व विचारांना उजाळा देण्यात आला. संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या विचारांचा वारसा पुढे अविरत प्रवाहीत राहावा या उद्देशाने युवा मंचातर्फे तरुणांनी एकत्र येऊन संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती साजरी केली. यावेळी सौरभ गोरेगावकर, सिद्धेश म्हशीलकर, पंकज वाळवाटकर, योगेश चांदोरकर, प्रतीक गोरेगावकर, सूरज वाळवाटकर, समर्थ म्हशीलकर, ज्येष्ठ सुरेश चांदोरकर, सुभाष वाळवटकर आदी समाज बांधव उपस्थित होते.

# वणव्याने हजारो एकर जंगल जळून खाक



**। वडखळ । प्रतिनिधी ।**

पेण वनविभागाच्या हद्दीत मागील काही महिन्यांपासून वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे हजारो एकर जंगल क्षेत्र जळून खाक झाले असून, याचा थेट फटका वन्यजीव आणि पर्यावरणाला बसत आहे. वणव्यांमुळे बेघर झालेल्या वन्यजीवांनी कुठे जायचे, असा गंभीर प्रश्न सामाजिक कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे.

सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी पेण वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांसह महाराष्ट्र शासनाचे महसूल व वन सचिव तसेच मुख्य वनसंरक्षक यांच्याकडे वेळोवेळी तक्रारी दाखल करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप केला आहे. मागील एका महिन्यातच पेण वनपरिक्षेत्रातील डोंगराळ भागात चार वेळा वणव्यांचे प्रकार घडल्याचे समोर आले असून, मागील आठवड्यात तर एकाच दिवशी दोन ठिकाणी वनवे लागले होते.

या घटनांची माहिती तात्काळ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना देऊनही वनवा लावणाऱ्यांचा शोध घेऊन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली नसल्याचे ठाकूर यांनी सांगितले. अखेर त्यांनी आपले सरकार पोर्टल तसेच कोर्टाच्या माध्यमातूनही तक्रार दाखल केली, मात्र तरीही प्रशासनाकडून दुर्लक्षच होत असल्याचा आरोप आहे.

दरम्यान, पेण तालुक्यातील हमरापुर परिसरात आज पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात वनवा लागून शेकडो एकर जंगल जळाले असून, वनसंपदा आणि वन्यजीवांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे पेण वनपरिक्षेत्र अधिकारी दगडखाणी, ठेकेदार आणि माती माफियांसाठी काम करत आहेत का, असा गंभीर सवाल आता स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे.

वणव्यांवर तातडीने नियंत्रण आणून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखणे अशक्य होईल, अशी मागणी जोर धरत आहे.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### बीरवाडीगड आणि घोसाळगडावर संशोधन | मंकला खेळाचे पट शोधण्यात यश

# किल्ल्यांच्या कातळावर उलगडला हजार वर्षांपूर्वीचा इतिहास



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

कोकणातील दुर्गवैभव केवळ त्यांच्या अभेद्य तटबंदीसाठीच नाही, तर तेथील समृद्ध सामाजिक जीवनासाठीही ओळखले जाते. याचाच एक महत्त्वपूर्ण पुरावा सह्याद्रीतील भटकंती करणारे सुजल संतोष पडवळ आणि वन्यजीव अभ्यासक रोशन म्हात्रे यांच्या संशोधनातून समोर आला आहे. रोहा तालुक्यातील ऐतिहासिक बीरवाडीगड आणि घोसाळगड परिसरात तब्बल १२० हून अधिक प्राचीन मंकला खेळाचे पट शोधण्यात या संशोधकांना यश आले आहे.

हे खेळपट साधारणपणे इ.स. ८०० ते ११०० या कालखंडातील, म्हणजेच राष्ट्रकूट किंवा शिलाहार राजांच्या काळातील असावेत. अंदाजे १००० ते ११२५ वर्षांपूर्वीचे हे ऐतिहासिक अवशेष त्या काळी किल्ल्यांवरील सैनिक आणि स्थानिक लोकांच्या विरंगुळ्याचे व बौद्धिक कौशल्याचे प्रमुख साधन होते. नुकतेच बीरवाडीगड या गडाच्या दक्षिणेकडे पायथ्याशी सुजल आणि रोशन यांना ५५ हून अधिक मंकला पट सापडले आहेत. हे पट प्रामुख्याने किल्ल्यावरील सपाट कातळावर कोरलेले आहेत. तर काही दिवसांपूर्वी घोसाळेगड या गडाच्या पायथ्याशी सुरुवातीला ५५ मंकला पट नोंदवले गेले होते, अधिक सखोल संशोधनानंतर ही संख्या आता ६५ च्या पार गेली आहे. केवळ एका किल्ल्यावर मर्यादित न राहता, रोहा परिसरात हा खेळ प्रचलित असल्याचे पुरावे संशोधनातून समोर आले आहेत.

**काय आहे मंकला खेळ?**

मॅन्कला हा जगातील सर्वात प्राचीन खेळांपैकी एक मानला जातो. आशिया आणि आफ्रिका खंडात मोठ्या प्रमाणावर खेळला जाणारा हा खेळ व्यापारमार्ग आणि सैनिकांच्या हालचालींमुळे भारतात पोहचला. दगडावर समोरासमोर कोरलेल्या खड्ड्यांमध्ये बिया किंवा खडे टाकून हा बुद्धीला चालना देणारा खेळ खेळला जातो.

**संशोधकांचे योगदान**

**सुजल पडवळ आणि रोशन म्हात्रे यांनी केलेल्या प्रत्यक्ष क्षेत्रीय अभ्यासामुळे किल्ल्यांवरील मानवी उपस्थिती आणि सामाजिक जीवनाचे नवे पदर उलगडले आहेत. हे अवशेष केवळ मनोरंजनाचे साधन नसून, ते आपल्या पूर्वजांच्या सांस्कृतिक प्रगल्भतेचे प्रतीक आहेत, असे मत संशोधकांनी व्यक्त केले आहे. या शोधामुळे रायगड जिल्ह्यातील किल्ल्यांच्या ऐतिहासिक महत्त्वात आणखी एक मोलाची भर पडली असून, दुर्गप्रेमींकडून या कार्याचे कौतुक होत आहे.**

**संवर्धन होणे आवश्यक**

**सुजल पडवळ व रोशन म्हात्रे यांनी सांगितले या गडकिल्ल्यांवरील ऐतिहासिक व सामाजिक संस्कृतीचा शोध घेणे हे आमचे ध्येय होते. बीरवाडी आणि घोसाळगडावर सापडलेले हे १२० हून अधिक खेळपट पूर्वजांच्या बौद्धिक कौशल्याची साक्ष देतात. हा हजार वर्षांपूर्वीचा अनमोल ऐतिहासिक ठेवा जगासमोर आणताना आम्हाला आनंद होत असून, त्याचे संवर्धन होणे हीच आमची इच्छा आहे.**

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल मोहम्मद अर्शद सिद्दीकी वगैरे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक यासर अनिस पटेल यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे. नारळाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १२ | ३/अ | १-४७-०० पो.ख. ०-९५-०० | १-२२ |

यापैकी यासर अनिस पटेल यांचे मालकीची व हिश्याची २-०२-०० हे. आर. क्षेत्राची मिळकत विकत देणेचे ठरले आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकवीस दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. ०२/०२/२०२६.

**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट,
ब्राम्हणआळी, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१.
मो.-९३२५०६००३७/९०११२९२९८७.

# निवडक



## कराटे स्पर्धेत सोहेलला सुवर्णपदक

**म्हसळा :** ६९ वी राष्ट्रीय कराटे स्पर्धा स्कूल गेम ऑफ इंडिया यांच्या मार्फत महाराष्ट्र (बारामती) येथे २६ ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान राष्ट्रीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, गोवा, पंजाब, आंध्रप्रदेश, राजस्थान, बिहार, तामिळनाडू, केरळ, ओडिशा, दिल्ली अशा विविध राज्यातील मुलांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये म्हसळा येथील सोहेल तांबे याने ६६ या वजनी गटात सुवर्णपदक व विक्रांत विश्वास खांडेकर याने ५० या वजनी गटात रौप्यपदक पटकावून आपल्या शाळेचे, गावाचे नाव मोठे केले आहे. राष्ट्रीय कराटे स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणार सोहेल हा म्हसळा तालुक्यातील पहिला खेळाडू ठरला आहे. त्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्याच्या या यशा मागे संतोष मोहिते व त्याचे प्रशिक्षक अविनाश मोरे याचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाराष्ट्र अध्यक्ष सलाउद्दीन अन्सारी व जनरल सेक्रेटरी संदीप गाडे व अभय कळमकर याचे सुद्धा मोलाचे सहकार्य लाभले आहे.

## समाधानची नेत्रदीपक कामगिरी

**उरण :** मास्टर्स गेम्स असोसिएशन आयोजित पहिली संयुक्त राष्ट्रीय मास्टर्स स्पर्धा २०२६ नाशिक येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत उरणच्या समाधान कणेकर यांनी नेत्रदीपक कामगिरी केली आहे. समाधानने ३५ वर्षांवरील पुरुष या गटामधील ४०० मीटर हर्डल्समध्ये सुवर्णपदक आणि १५०० मीटर धावणेमध्ये रौप्यपदक तसेच २०० मीटर धावणेमध्ये कांस्यपदक प्राप्त केले. त्यांच्या या यशाबद्दल समाजातील विविध स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यांनी २००८- ०९ वर्षी युनिव्हर्सिटीतर्फे १२. ५ किमी क्रॉस कन्ट्री स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले होते. समाधानची उल्लेखनीय कामगिरीमुळे इंडियन स्कुल इस्कसलेन्सतर्फे बेस्ट टीचर म्हणून त्यांचा सन्मान करण्यात आला.




## वैष्णवीची फुटबॉल संघात निवड

**रत्नागिरी :** कारवांचीवाडी येथील सेंट थॉमस स्कूलच्या वैष्णवी पडवळे हिची महाराष्ट्राच्या अस्मिता खेलो इंडिया फुटबॉल संघात निवड झाली आहे. सेंट थॉमस स्कूल फुटबॉल संघातून एकूण सहा मुलींची राज्य शिबिरासाठी निवड करण्यात आली होती. त्यातून वैष्णवी पडवळेची महाराष्ट्रीय अस्मिता खेलो इंडिया फुटबॉल संघात निवड झाली. गुजरातमधील भावनगर येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय अस्मिता खेलो इंडिया झोनल फुटबॉल अंडर-१३ संघामध्ये वैष्णवी आपली उत्कृष्ट कामगिरी बजावत आहे. महाराष्ट्रातून एकूण ३४ मुलींची राज्यस्तरीय खेलो इंडिया फुटबॉल संघाच्या प्रशिक्षण शिबिरासाठी निवड करण्यात आली होती. या मुलींमधून १४ मुलींची महाराष्ट्र अस्मिता खेलो इंडिया फुटबॉल संघात निवड झाली आहे. त्यात वैष्णवीचा समावेश आहे. रत्नागिरी जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष प्रसाद परांजपे, सचिव धनराज मोरे यांचे मुलींच्या फुटबॉल संघासाठी वेळोवेळी विशेष सहकार्य करत आहेत.

## अंकिता रैनाची विजयी सलामी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या वतीने आयोजित मुंबई ओपन डब्ल्यूटीए १ लाख २५ हजार डॉलर महिला टेनिस स्पर्धेत पात्रता फेरीच्या पहिल्या चरणात भारताच्या अंकिता रैनाने आकांक्षा नित्तुरेचा पराभव करून वर्चस्व गाजवले. तर, क्रिस्टिना सिडोरोव्हा, कुलिकोव्हा एनास्तेसिया, झुजाना पावलीकोव्स्का, मात्सुदा मिसाकी, निकोल फोस्सा हुएर्गो, पेंगतारण प्लिपुच, यास्मि कब्बाज यांनी विजयी सलामी दिली. मुंबई येथील एमएसएलटीएच्या टेनिस कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्या पात्रता फेरीत रशियाच्या क्रिस्टिना सिडोरोव्हा हिने २६ वर्षीय झील देसाईचा ६-२, ६-० असा सहज पराभव केला. सामन्यात १९ वर्षीय क्रिस्टिना हिने सुरुवातीपासूनचा आक्रमक खेळ करत झीलला सूर गवसण्याची फारशी संधी दिली नाही.

### परदेशी संघाकडून खेळणाऱ्या, देशी खेळाडूंच्या कामगिरीवर

# भारत, श्रीलंका, पाकिस्तानी क्रिकेट रसिकांचे लक्ष

**विनायक दळवी**

भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेतील १६ पैकी आठ संघ उदयोन्मुख संघ आहेत. या संघाच्या आपापसातील सामन्यांवर देखील जगातील क्रिकेट रसिकांचे लक्ष असेल. भारताच्या दृष्टीने किंवा आशियाई देशातील क्रिकेट रसिकांच्या दृष्टीने या आठ संघात भारत, पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेश या चारही देशांचे नागरिक, जे त्या त्या देशांमध्ये स्थायिक झालेत किंवा नोकरीनिमित्त आहेत, ते खेळताना पहावयास मिळतील. या सर्व खेळाडूंनीच युरोप अमेरिका आणि अन्य आफ्रिका उपखंडातील देशांना विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम टप्प्यापर्यंत आणल आहे. त्यामुळे या स्पर्धेत खेळणाऱ्या भारतीय, पाकिस्तानी, श्रीलंका आणि बांगलादेश वंशाच्या खेळाडूंवर देखील लक्ष असेल. त्यांची कामगिरी निश्चितच परिणामकारक ठरणारी आहे. विशेष म्हणजे अमेरिका युरोप आफ्रिका या खंडातील संघांचे प्रशिक्षक देखील भारत, श्रीलंका पाकिस्तान या देशांपैकीच आहेत. सपोर्ट स्टाफ देखील बऱ्याच अंशी या सर्व आशियाई देशांमधूनच निवडण्यात आलेला आहे.

**स्कॉटलंड** - ज्या संघांनी स्पर्धेसाठी आधीच पात्रता मिळवली नव्हती, अशा जगातील सर्वोच्च मानांकित संघ म्हणून स्कॉटलंडने या स्पर्धेत बांगलादेशची जागा घेतली. ते आयसीसी पुरुष टी-२० आंतरराष्ट्रीय संघ क्रमवारीत १४ व्या स्थानावर आहेत, स्पर्धेत आधीच असलेल्या सात संघांपेक्षा त्यांचे मानांकन जास्त आहे आणि ते आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकात सातव्यांदा सहभागी होत आहेत. क्रिकेट स्कॉटलंडचे कामगिरी प्रमुख स्टीव्ह स्नेल म्हणतात की, उशिरा संधी मिळूनही संघ तयार आहे आणि खेळण्यासाठी उत्सुक आहे. ते म्हणाले: निवडलेल्या संघाबद्दल मी, प्रशिक्षक आणि निवडकर्ते सर्वजण खूप उत्साहित आहोत. आम्हाला वाटते की हा संघ संतुलित आहे आणि भारतात संघाला सामोरे जाव्या लागणाऱ्या अनेक वेगवेगळ्या परिस्थिती आणि आव्हानांसाठी तो सज्ज आहे.



टी ट्वेंटी विश्वचषक

**यूएई** - आशिया-ईएपी प्रादेशिक पात्रता फेरीच्या सुपर सिक्स टप्प्याच्या शेवटी नेपाळ आणि ओमाननंतर तिसऱ्या स्थानावर राहिल्यानंतर यूएई आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकात तिसऱ्यांदा सहभागी होण्यासाठी सज्ज आहे.




कर्णधार मुहम्मद वसीमच्या संघाने २०२४ च्या स्पर्धेत पात्र होण्याची संधी थोडक्यात गमावली होती, परंतु यावेळी त्यांनी त्याची भरपाई केली आणि गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये आपला स्थान निश्चित करणारा २० वा आणि अंतिम देश बनला. त्यांनी पात्रता फेरीच्या शेवटच्या सामन्यात जपानवर आठ गडी राखून विजय मिळवला, ज्यामुळे त्यांना स्पर्धेत स्थान मिळाले. अलीशान शराफू पात्रता फेरीतील सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला, त्याने ५६.६० च्या सरासरीने आणि १४३.६५ च्या प्रभावी स्ट्राइक रेटने २८३ धावा केल्या.

**अमेरिका** - अमेरिकेला पात्रता फेरीतून जाण्याची गरज नव्हती, कारण २०२४ च्या स्पर्धेत मायदेशातील त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीमुळे त्यांचे स्थान निश्चित झाले होते.तिथे त्यांनी केवळ पाकिस्तानवरच ऐतिहासिक विजय मिळवला नाही, तर गट टप्प्यातून सुपर ८ मध्येही स्थान मिळवले. त्यानंतर दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज आणि इंग्लंडकडून पराभव पत्करावा लागला असेल, परंतु तोपर्यंत अमेरिकेच्या कामगिरीने त्यांच्या मायदेशातील समर्थकांची मने जिंकली होती.तीच कामगिरी पुन्हा करण्याचा मानस व्यक्त करत, मुख्य प्रशिक्षक पबुदु दासनायके म्हणाले: विश्वचषक संघ मजबूत, संतुलित आहे आणि प्रत्येक विभागात वर्चस्व गाजवण्यासाठी सज्ज आहे. आम्हाला आमच्या संघाच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास आहे.

# भारताचा न्यूझीलंडविरुद्ध मोठा विजय

### || इशानच्या शतकानंतर अर्शदीपच्या ५ विकेट्स || मालिका ४-१ फरकाने जिंकली

**| तिरुअनंतपूरम | वृत्तसंस्था |**

भारतीय संघाने तिरुअनंतपूरम येथे शनिवारी न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या टी-२० मालिकेतील पाचव्या सामन्यात ४६ धावांनी विजय मिळवला. या विजयासह भारताने मालिका ४-१ अशा फरकाने जिंकली. भारताच्या विजयात इशान किशन, सूर्यकुमार यादव, अक्षर पटेल आणि अर्शदीप सिंग यांचे मोलाचे योगदान राहिले. या सामन्यात भारताने न्यूझीलंडसमोर २७२ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा संघ १९.४ षटकात २२५ धावांवर सर्वबाद झाला. न्यूझीलंडसाठी फिन ॲलेनने चांगली झुंज दिली, पण अन्य फलंदाज फार काही करू शकले नाहीत.

या सामन्यात न्यूझीलंडने सलामीवीर फलंदाज टीम सिफर्टची विकेट पहिल्याच षटकात गमावली होती. अर्शदीपने त्याला ५ धावांवर हार्दिक पांड्याच्या हातून झेलबाद केले. पण नंतर फिन ॲलेनने वादळी खेळ केला. त्याने भारताच्या प्रत्येक गोलंदाजाविरुद्ध मोठे शॉट्स खेळले. त्याला दुसऱ्या बाजूने रचिन रवींद्र साथ देत होता. ॲलेनने २२ चेंडूतच अर्धशतक पूर्ण केले होते. तो ज्याप्रकारे खेळत होता, त्यावरून न्यूझीलंडच्या आशा जिवंत होत्या. त्याच्या खेळामुळे ८ षटकांमध्येच न्यूझीलंडने १०० धावांचा आकडा पार केला होता.




अखेर ९ व्या षटकात त्याला उपकर्णधार अक्षर पटेलन बाद करत भारताला मोठा ब्रेक थ्रू मिळवून दिला. फिन ॲलेनने ३८ चेंडूत ८ चौकार आणि ६ षटकारांसह ८० धावांची खेळी केली. तो बाद झाल्यानंतर मात्र अक्षर पेटल आणि अर्शदीप सिंगच्या गोलंदाजीसमोर न्यूझीलंडने नियमित अंतराने विकेट्स गमावल्या.

१७ व्या षटकात लॉकी फर्ग्युसनला अक्षर पटेलने ३ धावांवर त्रिफळाचीत केले. पण शेवटच्या षटकांमध्ये इश सोधीचे आक्रमक फलंदाजी केली. पण तोपर्यंत उशीर झाला होता. अखेर तो शेवटच्या षटकात रिंकु सिंगच्या गोलंदाजीवर अर्शदीप सिंगच्या हातून झेलबाद झाला. त्याने १५ चेंडूत ३३ धावा केल्या.



भारताकडून अर्शदीप सिंगने ५ विकेट्स घेतल्या. तसेच अक्षर पटेलने ३ विकेट्स घेतल्या. वरुण चक्रवर्ती आणि रिंकु सिंग यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. तत्पुर्वी, भारताने २० षटकात ५ बाद २७१ धावा केल्या. भारताकडून इशान किशनने ४३ चेंडूत ६ चौकार आणि १० षटकारांसह १०३ धावा केल्या.

कर्णधार सूर्यकुमार यादवने ३० चेंडूत ४ चौकार आणि ६ षटकारांसह ६३ धावांची खेळी केली. हार्दिक पांड्याने १७ चेंडूत ४२ धावा केल्या. अभिषेक शर्माने १६ चेंडूत ३० धावा केल्या. न्यूझीलंडकडून गोलंदाजी करताना लॉकी फर्ग्युसनने सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या. जेकॉब डफी, काईल जेमिसन आणि कर्णधार मिचेल सँटनर यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

### सूर्यकुमाराचा विक्रम

गेल्या वर्षभरापासून त्याच्या फॉर्मशी झुंजत असलेला भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत पुन्हा एकदा त्याच्या लयीत आला. सूर्यानं गेल्या सामन्यात ६३ धावांच्या खेळीदरम्यान टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३००० धावा पूर्ण केल्या. यासह, सूर्यकुमार हा जागतिक क्रिकेटमधील सर्वात जलद खेळाडू ठरला ज्यानं कमीत कमी चेंडूंमध्ये हा टप्पा गाठला. सूर्यकुमार यादवनं फक्त १८२२ चेंडूंमध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३००० धावा पूर्ण केल्या. यापूर्वी हा विक्रम यूएईच्या मोहम्मद वसीमच्या नावावर होता, ज्यानं १९४७ चेंडूंमध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३००० धावा पूर्ण केल्या होत्या.

## क्रिकेट स्पर्धेत डीबीजे विजेता

**चिपळूण :** खेड तालुक्यातील लवेल येथील घरडा अभियांत्रीकी महाविद्यालयात पद्मश्री डॉ. के. एच. घरडा स्मृती आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत चुरशीने झालेल्या अंतिम सामन्यात डीबीजे कॉलेज संघाने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला. आयटीआय चिपळूण संघाने द्वितीय आणि सह्याद्री पॉलिटेक्निकने संघाने तृतीय क्रमांक मिळवला. स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्यातील १६ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. स्पर्धे दरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच प्राचार्य डॉ. प्रमोद बी. पाटील, क्रीडा शिक्षक संजय बोले, तसेच क्रीडा समितीचे सदस्यांनी सर्व विजेत्यांचे कौतुक करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## सचिन माळी यांना क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार

**| रसायनी | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड (अलिबाग) यांच्यावतीने देण्यात येणारा जिल्हास्तरीय उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार (सन २०२३-२४) तायक्कांदो या खेळासाठी रसायनी तुराडे येथील सचिन शंकर माळी यांना प्रदान करण्यात आला. हा गौरव पोलीस परेड ग्राउंड, अलिबाग येथे समारंभात संपन्न झाला. हा पुरस्कार भरत गोगावले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



यावेळी रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किसन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

माळी हे गेली २५ वर्षे सातत्याने रसायनी तुराडे गाव तसेच खालापूर तालुक्यात तायक्कांदोचे प्रशिक्षण देत आहेत. ते रसायनी येथील महात्मा एज्युकेशन सोसायटी पिल्लई एचओसी स्कूल येथे वरिष्ठ क्रीडा शिक्षक म्हणूनही कार्यरत असून, त्यांनी बी.पी.एड. व एम.पी. एड. असे उच्च शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या यशाबद्दल संदीप ओंबासे, गफार पठाण, प्रसाद कुलकर्णी, रीमा निकाळजे, आर बी पाटील पद्मनाकक्षण, संदीप मुंढे, प्रतीक गायकवाड, दिनेश पढाया, रोहित सिनलकर, अमोल माळी, सौरभ नवले, सचिन मोरे व इतर मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

## अजिता राऊतची उत्कृष्ट कामगिरी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

इंदोर, मध्यप्रदेश येथे २३ जानेवारी रोजी झालेल्या राज्यस्तरीय केटलबेल स्पर्धेत अलिबाग येथील F80 फिटनेस स्टुडिओची खेळाडू अजिता राऊत हिने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले.



केटलबेल लाँग सायकल प्रकारात तिने ठराविक १० मिनिटांत १०९ रिपिटिशन्स पूर्ण करून हे यश मिळवले. या यशामागे तिचे प्रशिक्षक अद्वैत पाटील यांचे मार्गदर्शन व सातत्यपूर्ण सराव महत्त्वाचा ठरला.

## शिवाजी पार्क जिमखाना विजेता

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबई ओपन इंटरक्लब टेनिस चॅम्पियनशिप २०२६ ही स्पर्धा शिवाजी पार्क जिमखाना टेनिस कोर्ट्स येथे पार पडली. या स्पर्धेत बॉम्बे जिमखाना, सीसीआय, खार जिमखाना, शिवाजी पार्क जिमखाना, एमसीए, वुडहाऊस आदी सुमारे २० नामांकित क्लब्सनी सहभाग घेतला.

अंतिम सामना शिवाजी पार्क जिमखाना आणि मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) यांच्यात खेळवण्यात आला. या अंतिम सामन्यात शिवाजी पार्क जिमखाना विजेता ठरला.

उपांत्य फेरीच्या सामन्यात शिवाजी पार्क जिमखान्याने खार जिमखाना संघाला आणि एमसीएने सीसीआय या संघाला पराभूत केले.

या स्पर्धेचे आयोजन शिवाजी पार्क जिमखानाचे टेनिस सचिव योगेश परुळेकर आणि जनरल सेक्रेटरी संजीव खानोलकर यांनी केले होते.

मुंबई ओपन इंटरक्लब टेनिस चॅम्पियनशिप २०२६ ही स्पर्धा शिवाजी पार्क जिमखाना यांच्या वतीने, महाराष्ट्र जिल्हा टेनिस संघटना आणि महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना यांच्या सहकार्याने या स्पर्धा आयोजित करण्यात करण्यात आल्या होत्या.

### पहिल्यांदाच कोरल जेतेपदावर कोरले नाव | आर्यना साबालेन्काचा केला पराभव

# एलेना ऑस्ट्रेलियन ओपनची महाराणी

**| मेलबर्न | वृत्तसंस्था |**

कझाकस्तानची २६ वर्षीय एलेना रायबाकिनाने मोठा कारनामा करून दाखवल आहे. एलेना रायबाकिना ऑस्ट्रेलियन ओपन महिला चॅम्पियन बनली आहे. पहिला सेट जिंकून रायबाकिनाने तिचा जुना पराक्रम कायम ठेवला आहे. रायबाकिनाने तीन सेटच्या संघर्षपूर्ण खेळ करत अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आणि माजी विश्वविजेत्या बेलारूसची आर्यना साबालेन्का हिला हरवून तिचे दुसरे ग्रँड स्लॅम विजेतपद आपल्या नावे केले आहे.

पहिला सेट जिंकल्यानंतर, रायबाकिनाने तिचा २४ वा सामना आपल्या नावे केला.

### टेनिसचा प्रवास कठीण

कझाकस्तानच्या २६ वर्षीय रायबाकिनासाठी टेनिस प्रवास कठीण राहिला आहे. ती १५ वर्षांची होईपर्यंत, तिच्याकडे वैयक्तिक टेनिस प्रशिक्षक देखील उपलब्ध नव्हता, ती १८ वर्षांची होईपर्यंत, तिने इतर चार खेळाडूंसह एका गटात प्रशिक्षण घेतले होते. इतकेच नाही तर तिने खेळाडूंसाठी विशेष शाळा नव्हती म्हणून नियमित हायस्कूलमध्ये शिक्षण पूर्ण केले. तिच्या कारकिर्दीतील हे १२ वे मोठे विजेतपद आहे.



जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर, २०२३ आणि २०२४ ची विजेती आणि २०२५ ची अंतिम फेरी गाठणारी बेलारूसची आर्यना साबालेन्का हिला पहिल्या सेटमध्ये रायबाकिनाने ६-४ असा जबर धक्का दिला. या सेट विजयामुळे कझाकस्तानच्या रायबाकिनाला चांगलाच मानसिक फायदा झालेला दिसून येतो.

जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या सबालेंकाने दुसरा सेट ६-४ ने जिंकलाच नाही तर तिसऱ्या सेटमध्ये सर्व्हिस ब्रेक करून ३-० अशी आघाडी देखील मिळवली. तथापि, रायबाकिनाने पुनरागमन अंतिम सामना ६-४ ने जिंकून तिच्या पहिल्या ऑस्ट्रेलियन ओपन एकेरीच्या विजेतेपदावर नाव कोरले. रायबाकिनाने यापूर्वी चार वर्षांपूर्वी विम्बल्डन जेतेपद जिंकले होते. तेव्हापासून, ती फक्त एकदाच ऑस्ट्रेलियन ओपनच्या अंतिम फेरीत २०२३ मध्ये पोहोचली होती.

### एलिस-शुआईला दुहेरीचे विजेतेपद



**एलिस मेर्टेन्स आणि झांग शुआई यांनी ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ टेनिस स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावत महिला दुहेरीचे विजेतेपदावर नाव कोरले आहे. अनुभवी बेल्जियम आणि चिनी जोडीने अंतिम फेरीत अण्णा डॅनिलिना आणि अलेक्झांड्रा क्रुनिक यांचा ७-६(४), ६-४ असा दणदणीत पराभव करून जेतेपद जिंकले.**

# महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स ट्रॉफीचे आयोजन

### राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय महिला खेळाडूंचा सहभाग

**| मुंबई | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेली तिसरी महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स ट्रॉफी २०२५-२६ ही स्पर्धा यंदा महिला खेळाडूंना विशेष केंद्रस्थानी ठेवणारी ठरणार आहे. दादर येथील हॉलमध्ये ही स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. देशभरातील तसेच परदेशातील ५५ महिला कॅरमपटूसह ५०० खेळाडू या स्पर्धेत आपले कौशल्य दाखवत आहेत.




या स्पर्धेत पुरुष व महिला दोन्ही गटांचा समावेश असला, तरी महिलांच्या सहभागासाठी विशेष प्रोत्साहन देण्यात आले आहे. महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र पारितोषिके, बक्षिसांची रक्कम आणि सन्मान देण्यात येणार आहे. महाराष्ट्रासह दिल्ली, बंगाल, गोवा, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार, ओडिशा, झारखंड, उत्तराखंड, तेलंगणा आदी राज्यांतील महिला खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. विशेष म्हणजे, कॅनडा व श्रीलंका येथील महिला कॅरमपटूंचाही सहभाग अपेक्षित आहे, त्यामुळे स्पर्धेला आंतरराष्ट्रीय स्वरूप लाभणार आहे.

स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना रोख बक्षिसांसह चषक आणि प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. याशिवाय, उपांत्य व पूर्वफेरीपर्यंत पोहोचणाऱ्या महिला खेळाडूंनाही रोख बक्षिसे देऊन त्यांचा सन्मान केला जाणार आहे. त्यामुळे नवोदित आणि अनुभवी महिला खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय आयुर्विमा महामंडळ, इंडियन ऑइल, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, हिंदुस्तान पेट्रोलियम आदी नामांकित संस्थांचे सहकार्य लाभले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)